सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

सेतू-अभ्यास

Bridge-Course

इयत्ता-दहावी

विषय - मराठी

(द्वितीय भाषा)

अक्षरभारती

शैक्षणिक वर्ष २०२१-२२

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

सेतू अभ्यास (ब्रीज कोर्स) : इयत्ता दहावी

- प्रवर्तक : शालेय शिक्षण विभाग,महाराष्ट्र शासन
- प्रकाशक : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र,पुणे.
- प्रेरणा : **मा. वंदना कृष्णा**, (भा.प्र.से.)
  अपर मुख्य सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई.
- मार्गदर्शक : **मा. विशाल सोळंकी**, (भा.प्र.से.)
  आयुक्त (शिक्षण),महाराष्ट्र राज्य,पुणे.
  मा. राहुल द्विवेदी (भा.प्र.से.)
  राज्य प्रकल्प संचालक,महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद,मुंबई.
- संपादक : **मा. दिनकर टेमकर**
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र,पुणे.
- सहसंपादक : **डॉ.विलास पाटील**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र,पुणे.
- कार्यकारी संपादक: **डॉ.कमलादेवी आवटे**,
  उपसंचालक (भाषा व समता विभाग)
  श्रीमती नीता जाधव,
  उपविभागप्रमुख तथा अधिव्याख्याता, मराठी विभाग
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र,पुणे.
- संपादन सहाय्य : **डॉ.नंदा भोर, श्रीमती अश्विनी नरवणे,**
  विषय सहायक, मराठी विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र,पुणे.
- निर्मिती गटप्रमुख : **श्रीमती नम्रता शेजाळ**, अधिव्याख्याता, डायट रत्नागिरी.
- निर्मिती सदस्य : **१) डॉ. प्रिया निघोजकर** (साहाय्यक शिक्षिका, सु .रा. मुलींची प्रशाला सेवासदन, सोलापूर.)
  २) डॉ मीनल भोळे (साहाय्यक शिक्षिका,विद्याभवन शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, मुंबई.)
  ३) श्री. विजयकुमार सरगर (साहाय्यक शिक्षक, श्री काडसिद्धेश्वर हायस्कूल कोल्हापूर.)
  ४) श्रीम. दीपाली तारे (साहाय्यक शिक्षिका, आचार्य श्री विजय वल्लभ सेकंडरी स्कूल, पुणे.)
  ५)श्रीमती वैशाली आडमुठे (साहाय्यक शिक्षिका,यशवंतनगर हायस्कूल,यशवंतनगर, सांगली.)
  ६) श्री.यशवंत बेंद्रे (मुख्याध्यापक, महर्षी शिंदे हायस्कूल, आंबळे,ता. शिरूर,जि. पुणे.)

विद्यार्थ्यांशी हितगुज

विद्यार्थी मित्रांनो,

मागील शैक्षणिक वर्षात तुम्ही ऑनलाइन व इतर अनेक मार्गाने तुमचं शिकणं सुरू ठेवलंत, तुमचं खूप खूप कौतुक! आता नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होतंय. पुन्हा जोमानं आपण सुरुवात करणार आहोत. सुरुवातीला काही दिवस आपणाला मागील इयत्तेच्या पाठ्यक्रमाची उजळणी करायला हवी, जेणेकरून या वर्षीच्या अभ्यासक्रमासाठी आपली चांगली पूर्वतयारी होईल. ही पूर्वतयारी करणे सोयीचे व्हावे यासाठीच 'सेतू-अभ्यास' तयार करण्यात आला आहे. मागील शैक्षणिक वर्षात तुम्ही नेमके काय शिकलात? या इयत्तेत आपणाला काय नवीन शिकायचं आहे? हे समजून घेण्यासाठी हा सेतू- अभ्यास तुम्हाला मदत करेल.

त्यासाठी तुम्हाला काय करायचं ? तर हा सेतू-अभ्यास दिवसनिहाय क्रमाने सोडवायचा आहे. यात वेगवेगळ्या कृतींचा समावेश आहे. या कृती सोडवताना तुम्हाला मजा येईल. पण लक्षात ठेवा, या कृती इथे दिलेल्या नियोजनाप्रमाणे व स्वतः सोडवायच्या आहेत. सोडवताना काही अडचण आली तर शिक्षक आणि पालक मदत करायला आहेतच. आणि हो, हा ४५ दिवसाचा अभ्यास करताना दर पंधरा दिवसांनी तुम्हाला एक छोटीसी चाचणी सोडवायची आहे. चाचणी स्वतः एकट्याने सोडवा. चाचणी सोडवून झाल्यावर ती तुमच्या शिक्षकांकडून तपासून घ्या.

हा सेतूअभ्यास सोडवताना काही भाग समजला नाही किंवा अवघड वाटला तर काळजी करू नका. तो समजून घेण्यासाठी तुमच्या शिक्षकांची किंवा पालकांची मदत घ्या.

हा सेतू अभ्यास पूर्ण करण्यासाठी तुम्हांला मनःपूर्वक शुभेच्छा !

शिक्षक / पालकांसाठी सूचना

कोविड १९ च्या उद्भवलेल्या परिस्थितीमुळे मागील शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष विद्यार्थी समोर असताना वर्ग अध्यापन होऊ शकले नाही. नव्या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष शाळा कधी सुरू होतील याबाबत अनिश्चितता आहे. मागील शैक्षणिक वर्षात आपण ऑनलाइन माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचवण्यासाठी विविध प्रयत्न केलेत. **मागील शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांनी केलेल्या अध्ययनाची उजळणी व्हावी तसेच नवीन शैक्षणिक वर्षात शिकाव्या लागणाऱ्या अभ्यासक्रमाची पूर्वतयारी हा दुहेरी उद्देश ठेवून हा सेतू अभ्यास तयार करण्यात आला आहे.**

- सेतू अभ्यास एकूण ४५ दिवसांचा असून त्यात ठराविक कालावधीनंतर घ्यावयाच्या एकूण तीन चाचण्यांचा समावेश आहे.
- सेतू अभ्यास हा मागील इयत्तेच्या पाठ्यक्रमावर आधारित असून मागील इयत्तेचा पाठ्यक्रम व सध्याच्या इयत्तेचा पाठ्यक्रम यांना जोडणारा दुवा आहे.
- सदर अभ्यास हा इयत्तानिहाय व विषयनिहाय तयार करण्यात आला असून तो मागील इयत्तेच्या पाठ्यपुस्तकाशी संलग्न व त्यातील घटकांवर आधारित आहे.
- सदर सेतूअभ्यासात क्षेत्र,कौशल्य,संकल्पना व अध्ययन निष्पत्ती/क्षमता विधाने यांचा समावेश केला आहे.विद्यार्थ्यांना नेमके काय मार्गदर्शन करायचे आहे यासाठी मदत होईल.
- संकल्पनाप्रमाणे 'जाणून घेऊ या' मध्ये संबंधित संकल्पनेबाबत विद्यार्थ्याचे पूर्वज्ञान जाणून घेण्यासाठी, 'जाणून घेऊ या' मधील संकल्पनेबाबत त्याने अधिक सक्षम व्हावे यासाठी **'सक्षम बनू या'** मिळालेल्या माहितीचे किती आकलन झाले यासाठी **'सराव करू या'** व सराव करू यामध्येछ मिळालेल्या माहितीच्या आधारे विद्यार्थ्याने आधी चिकित्सक विचार करावा,सर्जनशील व्हावे,अर्थात उच्च बोधात्मक क्षमतांच्या विकासासाठी **काही कृतींचा समावेश केला आहे.**या सदरांचा समावेश केला आहे. .
- संकल्पना अधिक चांगल्या रीतीने समजून घेण्यासाठी मदत हवी म्हणून दीक्षा ॲप, क्यु आर कोड इ.ची मदत घ्यावी.
- . शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्यांकडून सदरचा सेतू अभ्यास दिवसनिहाय नियोजनाप्रमाणे पूर्ण करून घ्यावा.
- चला सराव करू या हे सदर विद्यार्थी स्वप्रयत्नाने सोडवेल याकडे शिक्षकांनी लक्ष द्यावे, आवश्यक तेथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.
- निश्चित केलेल्या कालावधीनंतर घ्यावयाच्या चाचण्या विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्याव्यात, चाचण्या तपासून विद्यार्थीनिहाय गुणांची नोंद स्वतःकडे ठेवावी.
- चाचणी तपासताना विद्यार्थीनिहाय विश्लेषण करून मागे पडलेल्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त पूरक मदत करावी.

अनुक्रमणिका

अ क्र	घटकाचे नाव	दिवस	पान क्रमांक
१	काव्यानंद	१	८
२	गद्य विभाग: चरित्र व आत्मचरित्र	२/३ /४	९,१०
३	गद्य विभाग विज्ञान कथा	५/६	११,१२
४	पद्य विभाग (मुल्याधिष्ठीत)	७/८/९	१३,१४
५	अलंकार	१०	१५,१६
६	कथा लेखन	११/१२	१७,१८
७	वाक्य-प्रकार	१३	१९,२०
८	वाक्यरूपांतर	१४	२१,२२
९	चाचणी	१५	२३,२४
१०	गद्य विभाग: विश्वकोश	१६ /१७	२५,२६
११	पद्य विभाग	१८	२७,२८
१२	वचन बदला	१९	२९
१३	जाहिरात लेखन	२०/२१	३०
१४	वाक्प्रचार	२२	३१,३२
१५	शब्दसमूहाबद्दल एक शब्द	२३	३३,३४
१६	बातमी लेखन	२४/२५	३५
१७	पद्य विभाग (अभंगवाणी)	२६/२७	३६,३७
१८	गद्य विभाग (स्थूल वाचन)	२८/२९	३८,३९
१९	चाचणी	३०	४०,४१
२०	पद्य विभाग	३१/३२	४२,४३
२१	समानार्थी व विरुद्धार्थी शब्द	३३	४४,४५
२२	विरामचिन्हे	३४	४६,४७
२३	पद्य विभाग	३५	४८,४९
२४	लेखन नियम	३६	५०,५१
२५	आत्मकथन लेखन	३७/३८	५२,५३
२६	प्रसंग लेखन	३९/४०/४१	५४,५५
२७	पत्रलेखन	४२ /४३	५६,५७
२८	समास	४४	५८,५९
२९	चाचणी	४५	६०,६१



महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

सेतू अभ्यास कृती आराखडा

इयत्ता –दहावी विषय – मराठी(द्वितीय भाषा) कालावधी – ४५ दिवस

➢ उद्दिष्टे:-

1. कोविड -१९ च्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या मनात अध्ययनाविषयी आत्मविश्वास निर्माण करून शिकण्यासाठी आनंददायी वातावरणाची निर्मिती करणे.

2. विद्यार्थ्यांना गत शैक्षणिक वर्षातील संबंधित इयत्तेच्या भाषा अध्ययनातील अंतर भरून काढण्यास मदत करणे.

3. विद्यार्थ्यांना मागील इयत्तानुरूप भाषा विषयातील अपेक्षित अध्ययन निष्पत्तीनुसार समजपूर्वक वाचनाची संधी उपलब्ध करून संबंधित क्षमता वृद्धिंगत होण्यास मदत करणे.

4. विद्यार्थ्यांना मागील इयत्तेशी जोडून घेण्यासाठी स्वयंअध्ययनासाठी उपयुक्त अशा आनंददायी व कृतियुक्त आशयाची निर्मिती करणे.

5. विद्यार्थ्यांना अभिव्यक्त (लेखन) होण्याची संधी उपलब्ध करून देणे.

➢ अपेक्षित कौशल्य/ संकल्पना(इयत्ता निहाय):-

1. मौखिक भाषा विकास- श्रवण,भाषण संभाषण .....

2. भाषाभ्यास – व्याकरण घटकावर आधारित /भाषिक घटकावर आधारित

3. वाचन- पठित /अपठित उतारे

4. लेखन – उपयोजित लेखन

दिवस १

कौशल्य श्रवण /वाचन

क्षमता : १ . गाणी, कविता, समूह गीते योग्य अभिनयासह व योग्य आरोहअवरोहासह म्हणता येणे.

२. साहित्य प्रकारांच्या ध्वनिफिती समजपूर्वक ऐकता येणे.

१. सर्वात्मका शिवसुंदरा



सर्वात्मका शिवसुंदरा स्वीकार या अभिवादना।
तिमिरातुनी तेजाकडे प्रभु आमुच्या ने जीवना।।

सुमनांत तू गगनात तू
ताऱ्यांमध्ये फुलतोस तू
सद्धर्म जे जगतामधे
सर्वांत त्या वसतोस तू
चोहीकडे रूपे तुझी जाणीव ही माझ्या मना।।

श्रमतोस तू शेतामधे
तू राबसी श्रमिकांसवे
जे रंजले वा गांजले
पुसतोस त्यांची आसवे
स्वार्थाविना सेवा जिथे तिथे तुझे पद पावना।।

न्यायार्थ जे लढती रणी
तलवार तू त्यांच्या करी
ध्येयार्थ जे तमि चालती
तू दीप त्यांच्या अंतरी
ज्ञानार्थ जे तपती मुनी होतोस त्यांची साधना।।

करुणाकरा करुणा तुझी
असता मला भय कोठले
मार्गावरी पुढती सदा
पाहीन मी तव पाउले
सृजनत्व या हृदयामध्ये नित जागवी भीतीविना।।

प्रस्तुत गीत हे काव्यानंदासाठी घेतले असून, ते विद्यार्थ्यांकडून तालासुरात म्हणवून घ्यावे.

दिवस २ /३ /४

क्षेत्र / कौशल्य – संभाषण, वाचन, लेखन

संकल्पना – साहित्यप्रकार : चरित्र, आत्मचरित्र

क्षमता /कौशल्य :१. साहित्यप्रकाराचे मूल्यमापन करणे.

२. चिकित्सक विचार करून स्वतंत्र व प्रभावी लेखन करता येणे.

जाणून घेऊ या

विद्यार्थी – मित्रांनो, स्वत:विषयी बोलायला आपल्याला नेहमीच आवडतं; पण आपण ते लिहीत नाही. चला..... एक वेगळी कृती करू. स्वत:विषयी वहीत १५ ते २० ओळी लिहा. पालकांची मदत घ्या.

पुढील उतारा लक्षपूर्वक वाचा व त्यावर आधारित कृती सोडवा.

आईला झाडापेडांची खूप हौस होती. तिने परड्यात फुलझाडांबरोबर नाना जातींच्या औषधी वनस्पती लावल्या होत्या. कोष्ट, कोळिंजन, किराईत, आंबा, वावडिंग, कुडा, अडुळसा, कोरफड यांसारखी झाडे तिच्या हातची. घरात मुलांपैकी कोणी आजारी पडले, की आई परड्यात जाऊन कसलातरी पाला, मुळ्या घेऊन यायची. कफ झाला की कोरफडीचे चाटण असेच. अडुळशाचा गोड काढा प्याल्यावर खोकला पळायचाचं. त्या झाडासारखीच निगराणी आई शेवग्याची करायची. मग आईचा शेवगा तरी मागे कसा राहील? तोही भराभर वाढत होता. आम्ही त्याची वाढ न्याहाळत होतो. असे दोन तीन वर्ष गेली आणि हिवाळ्यातील एके दिवशी त्याची एक डहाळी- शुभ्र फुलांनी डवरलेली आईने स्वयंपाकघराच्या खिडकीतून पाहिली.

"अगोबाई ! शेवगा फुललासा वाटतो !" आई लगबगीने बाहेर गेली. परड्यात जाऊन तिने डोळे भरून ते कौतुक निरखले. तिचा शेवगा खरोखरच खुल्ला होता ! आता त्याला शेंगा येणार होत्या. आईचे माहेरचे जणू जितेजागते होऊन तिच्या सहवासाला आले होते.

कृती :

१. लेखकाने वर्णन केलेले आईचे गुणविशेष तुमच्या भाषेत लिहा.
२. उताऱ्यात आलेल्या औषधी वनस्पतींची नावे लिहा.
३. उताऱ्यात आलेली वेगवेगळ्या बोलीभाषेतील वाक्य शोधा. ते कोणत्या बोलीभाषेतील आहे ते शोधून लिहा.
४. तुमच्या आईविषयी सहा ते आठ ओळी लिहा.

सक्षम बनूया

हे लक्षात ठेवा – चरित्र, आत्मचरित्र हा आपल्या मराठी साहित्याचा मौलिक ठेवा आहे. अशा प्रकारच्या लेखनात खरेपणा, अलिप्तपण, कलात्मक लेखन आदी बाबी महत्त्वाच्या असतात बरं का ! अशा प्रकारच्या वाचनानं आपली चिंतनशीलता वाढते. जगण्याची दृष्टी व्यापक होते.

प्रस्तुत उतारा हा आत्मचरित्र लेखनाचाच एक नमुना आहे. तो लक्षपूर्वक वाचा. त्यावर आधारित कृती सोडवा.

विहिरीपासून मी परतले, तेव्हा मन नवीन गोष्टी शिकण्यासाठी आतूर झालं होतं. आता प्रत्येक गोष्टीला नाव होतं आणि नावा - नावातून उमलत होता एकेक नवा विचार ! घरात आल्यावर मी स्पर्श करायची ती प्रत्येक वस्तू जशी स्पर्शागणिक चैतन्याने थरथरायची. मला जशी एक वेगळीच नवी दृष्टी मिळाली होती. आता त्या दृष्टीतून मी सगळं 'पाहत' होते. दारापाशी आल्यावर मला मी मोडलेल्या बाहुलीची आठवण झाली. चाचपडत शेकोटीजवळ लोटलेले बाहुलीचे तुकडे मी गोळा करून उचलले. तुकडे जोडून पाहात पुन्हा त्यांची बाहुली करण्याचा मी कसोशीने प्रयत्न करत राहिले. आता माझ्या हातून घडलेल्या चुकीची जाणीव होऊन माझे डोळे भरून आले. पहिल्यांदाच मला खऱ्या अर्थाने पश्चाताप झाला, फार वाईट वाटलं. त्या दिवशी मी खूप नवे शब्द शिकून घेतले. ते सगळेच काही. नेमके कोणते ते आता आठवत नाही. पण त्या शब्दांत 'आई' ,'बाबा', 'बहिण', 'बाई', हे शब्द होते एवढं निश्चित. आयुष्यात नव्यानं आलेल्या या शब्दांनी माझ्या भावविश्वात पालवी फुटली. तो दिवस माझ्या दृष्टीने फार नाट्यमय होता. रात्री मी माझ्या चिमुकल्या पलंगावर झोपी गेले, तेव्हा माझ्याइतका दुसरा आनंदी जीव कोठे सापडला नसता. दिवसभराच्या आनंददायी आठवणी पुन्हा पुन्हा मी आठवत राहिले. आयुष्यात पहिल्यांदाच मला 'उद्या' कधी उगवतोय, याची उत्कंठा लागून राहिली होती.

कृती

१. हेलन केलर आयुष्यात पहिल्यांदाच उद्याची वाट का पाहत असेल याविषयीचे तुमचे मनोगत सहा ते आठ ओळीतं लिहा.

२. 'सर्वसामान्य मुलांबरोबर दिव्यांग मुलांना शिक्षणाची समान संधी द्यायला हवी ' याबाबत तुमचे मत लिहा.

३. पश्चाताप करावा लागलाय असा प्रसंग तुमच्या आयुष्यात घडला का ? याचे चिंतन करा आणि केवळ तुमच्यासाठीच तो प्रामाणिकपणे लिहून काढा.

चला सराव करूया

पुढील कृती सोडवा

१. स्वतः विषयीचे केलेले लेखन म्हणजे .....

२. एखाद्या व्यक्तीच्या जीवनातील विविध टप्पे, त्यांचा तपशील लिहिणे म्हणजे .....

३. साहित्यिक व त्यांची आत्मचरित्रे यांच्या जोड्या जुळवा.

'अ' गट	'ब' गट
१. वि. स. खांडेकर	१. तराळ अंतराळ
२. जयंत नारळीकर	२. एका पानाची कहाणी
३. किरण बेदी	३. द स्टोरी ऑफ माय लाईफ
४. हेलन केलर	४. आय डेअर
५. शंकरराव खरात	५. चार नगरातील माझे विश्व

दिवस ५/६

क्षेत्र / कौशल्य – लेखन संकल्पना – कथालेखन

क्षमता – १. दिलेल्या विषयांमध्ये स्वतःच्या विचारांची कल्पनांची भर घालून पुनर्लेखन करता येणे.

२. म्हणी, वाक्प्रचार, सुभाषिते इ. लेखनात प्रभावी वापर करता येणे.

जाणून घेऊ या

एक मुलगी - शिकण्याची जिद्द - प्रतिकूल परिस्थिती – आई - वडिलांचे मोलमजुरी करून घर चालवणे - ऑनलाइन शाळा -ऑनलाईन शाळेसाठी साधन नसणे- परिस्थितीवर मात -अशा परिस्थितीतही स्पर्धा परीक्षेत यश - शिष्यवृत्ती मिळवणे - सर्वांना आनंद – तात्पर्य.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील मुद्दे वाचण्यास सांगून कथा लेखनाविषयी चर्चा करावी.

१ वरील कथेला कोणते शीर्षक द्याल?

२ कथेतील ठिकाण, पात्रांची नावे व त्यांच्यातील संवाद यावर चर्चा करावी.

३ कथेसाठी किती व कसे परिच्छेद कराल?

४ कथेला अनुसरून कोणत्या म्हणी, वाक्प्रचार अथवा सुभाषितांचा वापर करता येईल?

५ वरील कथेचे कथाबीज सांगा.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे गट तयार करून वरील कथेतील पात्रे, घटना व घटनाक्रम, ठिकाण, सुसंगतपणा या विषयी चर्चा करण्यास सांगावे.

कथेच्या मुद्द्यांच्या व त्यावर आधारित प्रश्नांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कथेविषयी असलेली जाण समजून घ्यावी.

सक्षम बनू या

शिक्षकांनी कथालेखन अधिक दृढ होण्यासाठी वरील मुद्द्यांच्या आधारे विद्यार्थ्यांना कथा लेखन करण्यास सांगावे.

१ कथेला योग्य शीर्षक द्यावे.

२ कथा भूतकाळात लिहावी.

३ व्यक्ती, वस्तू, ठिकाण यांना योग्य नावे द्यावीत.

४ कथाबीजाला अनुसरून पात्र व त्यांच्यातील संवाद असावेत.

५ कथा ३/४ परिच्छेदात लिहावी.

६ कथेची भाषा घटनांचा कालानुक्रम योग्य असावा.

७ योग्य विरामचिन्हांचा वापर करावा.

८ योग्य म्हणी, वाक्प्रचार, सुभाषिते यांचा वापर करावा.

वरील कथालेखनाच्या निकषांच्या आधारे विद्यार्थ्यांनी आपण कथा लिहिली आहे का? हे अभ्यासावे. गरज असल्यास कथेचे पुनर्लेखन करावे.

चला सराव करू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील शब्दांच्या आधारे कथा लिहिण्यास सांगावी व योग्य शीर्षक देण्यास सांगावे.

मित्र – नदी - गणपती विसर्जन मिरवणुक - निर्माल्य कलश - जबाबदारी व कर्तव्य

- शिक्षकांनी अशा प्रकारची विविध उदाहरणे देऊन कथा लेखनाचा सराव करून घ्यावा.
- विद्यार्थ्यांनी शब्द, कथाविषय, पूर्वार्ध दिल्यास उत्तरार्ध लिहिणे किंवा उत्तरार्ध दिल्यास पूर्वार्ध लिहिणे आणि मुद्द्यांच्या आधारे कथालेखन करण्याचा सराव करावा.

दिवस ७/८/९

क्षेत्र / कौशल्य – वाचन, लेखन संकल्पना – गद्य

क्षमता /कौशल्य : १. विविध साहित्य-प्रकार समजपूर्वक अभ्यासता येणे.

२. चिकित्सक विचार करून स्वतंत्रपणे विचार मांडणी आणि त्यानुसार लेखन करणे.

जाणून घेऊ या

विद्यार्थ्यांनी पुढील उताऱ्याचे प्रगट वाचन करावे. त्याचा आशय समजून घ्यावा. त्यावर आधारित दिलेल्या कृती स्वभाषेत सोडवाव्यात. आवश्यक तेथे शिक्षकांचे. पालकांचे मार्गदर्शन घ्यावे.

पहिला पाश्चिमात्य धन्वंतरी असा उल्लेख हिपॉक्राटेझचा केला जातो. त्याचा जन्म ख्रिस्तपूर्व काळात 460 साली झाला आणि मृत्यू 350 या साली. आपल्या नव्वद वर्षांच्या आयुष्यात त्याने फार मोठी कामगिरी केली, ती ही, की वैद्यकशास्त्राला भूतपिशाच्च देवदेवता यांच्या पकडीतून बाहेर काढले आणि त्याला शास्त्र म्हणून दर्जा प्राप्त करून दिला. रोग ही एक नैसर्गिक बाब असून निसर्गत:च व्याधी बऱ्या होऊ शकतात. भूतपिशाच्चांचा आणि शारीरिक असमर्थतेचा अन्योन्य संबंध काहीच नसतो. कौलशकुन या अवांतर गोष्टीमुळे दु:ख कमी होत नसते, असे त्याने जन्मभर प्रतिपादले. प्रत्येक रोगाचे आणि रोग्याचे वैद्याने नीट निरीक्षण केले पाहिजे आणि रोगाच्या मन:स्थितीचा अंदाज घेऊन त्याची जुळवणी शरीरातील रक्त-मांस-मद वगैरे गोष्टींशी करून औषध द्यायला हवे त्यासाठी स्वतः वैद्याने एक शपथ घ्यायला हवी. वैद्यकीय पेशाशी आणि आपल्या रोग्याशी एकनिष्ठ राहायला हवे, असे अलिखित दंडक त्याने वैद्यकशास्त्रावर घातले. त्याने घातलेला हा अलिखित दंडक अजुनही पाळला जातो. 'हिपॉक्राटेझ प्रतिज्ञा' घेऊनच प्रत्येक वैद्य-डॉक्टर आपल्या पेशात पदार्पण करतो.

कृती :

१. हिपॉक्राटेझची मौलिक कामगिरी लिहा.
२. प्रत्येक वैद्याने घ्यावयाची शपथ लिहा.
३. तुम्हास माहीत असलेल्या पाच अंधश्रद्धा लिहा.
४. रोग ही एक नैसर्गिक बाब आहे आणि निसर्गत: व्याधी बऱ्या होऊ शकतात. या हिपॉक्राटेझच्या मताविषयीचे तुमचे विचार सहा ते आठ ओळींत लिहा.

४. वैज्ञानिक प्रगतीने माणूस सुखी झाला आहे काय ? या प्रश्नाचे चिंतन करा. कुटुंबात त्याविषयी चर्चा करा. त्याचा तपशील थोडक्यात लिहा.

सक्षम बनू या

विद्यार्थी मित्रांनो, कुठलाही शोध अगदी सहज लागत नसतो. त्यामागे अथक परिश्रम, प्रयत्न असतात. विज्ञानातील रंजक किस्से, कल्पना आपण विज्ञान कथांमधून वाचतो. मराठी भाषेतही उत्तमोत्तम विज्ञान कथा आहेत. त्यांचा शोध घ्या. त्या वाचा. मनोरंजनातून ज्ञान माहिती वाढवा, इतरांनाही त्या सांगा.

सतत दहा ते बारा वर्ष प्रयोग करून पाहिल्यानंतर दिव्यामध्ये फिलमेंटसाठी वापरण्यात येणाऱ्या टंगस्टन धातूचा प्रयोग यशस्वी झाला. इतका महत्त्वपूर्ण शोध लागला; पण तो लोकांना माहीत कसा व्हावा ? त्याच्या डोक्यात एक कल्पना आली. मेन्लो पार्क येथील घराभोवती त्याने प्रचंड मोठा मंडप उभारला. त्या ठिकाणी नाना प्रकारच्या दिव्यांची आकर्षक रोषणाई केली. झाडात, झुडपांत, अंगणात, गच्चीवर किंबहुना जेथे जागा मिळेल तेथे वाटाण्यापासून भोपळापर्यंतच्या विविध आकाराचे आणि रंगाचे दिवे लावण्यात आले. तो दिवस होता २१ ऑक्टोबर १८७९ चा. घराभोवतीचा दिव्यांचा झगमगाट पाहायला सारे गावच्या गाव लोटले. एडिसनने केलेल्या या दिवाळीचा वर्तमानपत्रात आणि सगळीकडे गवगवा झाला. वर्तमानपत्रातून दिव्यांचा शोधाची बातमी जगभर पसरली. २१ ऑक्टोबर १९२९ या दिवशी एडिसनने लावलेल्या दिव्यांचा शोधला पन्नास वर्षे पूर्ण झाल्यावर साऱ्या अमेरिकेने हा दिवस एखाद्या मोहत्सवासारखा साजरा केला. एका मोठ्या समारंभात अमेरिकेच्या अध्यक्षांनी एडिसनचा सन्मान केला. या घटनेच्या निमित्ताने अमेरिकेच्या पोस्टखात्याने दिव्याचे चित्र असणारी तिकिटे प्रसिद्ध केली.

कृती : १. आकृतीबंध पूर्ण करा.

एडिसनचे स्वभावविशेष

१. 'दिव्यांच्या शोधाला पन्नास वर्षे पूर्ण झाल्यावर अमेरिकेने तो दिवस महोत्सवासारखा साजरा केला' या कृतीविषयी तुम्हाला काय वाटते ते सहा ते आठ ओळींत लिहा.

२. 'यश मिळविण्यासाठी बुद्धिमत्तेबरोबरच चिकाटीही हवी' या विधानाशी तुम्ही सहमत आहात काय ? सकारण लिहा.

३. उताऱ्यातील वाक्य-प्रचार शोधा व त्यांचा अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा.

चला सराव करूया

पुढील कृती सोडवा.

१. मनातील विचार, कल्पना प्रत्यक्ष कृतीत आणण्यासाठी तुम्ही कोणकोणते प्रयत्न कराल ?

२. तुमच्या कल्पक शोधक, दृष्टीचा एखादा अनुभव थोडक्यात लिहा.

दिवस १०/११

क्षेत्र / कौशल्य - वाचन, लेखन संकल्पना – पद्य – मूल्याधिष्ठित

क्षमता /कौशल्य : विविध मूल्यांवर आधारित कवितेचे सूक्ष्म वाचन करून मूल्यांचे सामर्थ्य स्पष्ट करून त्याचा आनंद घेता येणे.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी पूर्वज्ञानावर आधारित उदाहरणे देऊन मागील इयत्तेतील विविध मूल्यांवर आधारित कवितांचा उल्लेख करून ती मूल्ये विद्यार्थ्यांच्या अंगी बाणवण्याचा प्रयत्न करणे.

तिफन

काया मातीत मातीत तिफन चालते
ईज नाचते थयथय
ढग ढोल वाजवते
नंदी बैलाच्या जोळीले सदाशिव हकालते
वटी बांधून पोटाले पाराबती उनारते
वटी पोटाले बांधते झोयी काटीले टांगते
झोयी काटीले टांगते त्यात तानुलं लळते
त्यात तानुलं लळते ढग बरसते

शिक्षकांनी श्रमप्रतिष्ठा या मूल्याची ओळख कवितेतून करून देऊन स्व-कष्टातील आनंदाची विद्यार्थ्यांना अनुभूती द्यावी .

प्रश्न-अ-१) कवितेत आलेले यमक साधणारे शब्द निवडून लिहा.
२) वऱ्हाडी शब्द व प्रमाण भाषेतील शब्द ओळखून लिहा.
३) 'वटी पोटाले बांधते झोयी काटीले टांगते', या ओळीचा संदर्भ स्पष्ट करा.

सक्षम बनू या

छोटेसे बहीणभाऊ,
उद्याला मोठाले होऊ.
उद्याच्या जगाला, उद्याच्या युगाला,
नवीन आकार देऊ ll धृ ll
ओसाड, उजाड जागा,
होतील सुंदर बागा,
शेतांना, मळ्यांना, फुलांना, फळांना,
नवीन बहार देऊ ll १ ll

मोकळ्या आभाळी जाऊ,
मोकळ्या गळ्याने गाऊ,
निर्मळ मनाने, आनंदभराने,
आनंद देऊ अन् घेऊ ll २ ll
प्रेमाने एकत्र राहू,
नवीन जीवन पाहू,
अनेक देशांचे, भाषांचे, वेशांचे,
अनेक एकत्र होऊ ll ३ ll

(वसंत बापट)

शिक्षक विद्यार्थ्यांना विविध मूल्यांवर आधारित कवितेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनावर सुसंस्कारित मूल्यांचा ठसा उमटवतात.


कृती

१) बहीणभाऊ उद्याच्या जगाला, युगाला कसा आकार देणार आहेत ?

२) बहीणभाऊ मोठे होऊन काय करणार आहेत ?

३) कोणकोणत्या गोष्टींना नवीन बहार येईल ?

शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मनात उद्याच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न निर्माण करणे. यंत्र आणि तंत्र युगात ही मानवाला श्रमाची आवश्यकता आहे हे दाखवून देणे.



स्वप्न करू साकार

(किशोर पाठक)

शिक्षकांनी वरील कवितेतून देशाच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न रेखाटण्याचा प्रयत्न करणे. कृषी-संस्कृती, श्रमप्रतिष्ठा व एकजुटीचे सामर्थ्य या मूल्यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगणे.

कृती.

१) संकल्पना स्पष्ट करा.

अ) श्रमशक्तीचे मंत्र-

आ) हस्त शुभंकर-

इ) आभाळावर उत्क्रांतीचा घुमवू या ललकार-

२) कवितेत व्यक्त झालेला एकात्मतेचा विचार स्पष्ट करा.

दिवस १२

क्षेत्र / कौशल्य – लेखन संकल्पना –अलंकार

क्षमता/कौशल्य : लेखन करताना अलंकाराचा वापर करता येणे.

जाणून घेऊ या

खालील उदाहरणाच्या मदतीने शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी चर्चा करावी किंवा गटात चर्चा करण्यास सांगावी. अलंकार या घटकाबाबत जाणून घेणे .

१) बाळाचा चेहरा सुंदर आहे.
२) फुलासारखा चेहरा तुझा बाळा.

१) चौकटीमधील दुस-या वाक्यामध्ये कोणत्या दोन घटकांची तुलना केली आहे ?

१. ..... २. .....

२) चौकटीमधील दुस-या वाक्यामध्ये कोणाची तुलना कोणाशी केली आहे ?

१. ..... २. .....

३) बाळ आणि फूल यांच्यामधील समान गुण ओळखून लिहा.

.....

४) बाळ आणि फूल यांच्यामधील सारखेपणा दाखवण्यासाठी कोणता शब्द वापरलेला आहे ?

.....

शिक्षकांनी वरील चर्चेप्रमाणे विविध उदाहरणे देऊन उपमेय, उपमान, समानधर्म, साधर्म्यवाचक शब्द व अलंकार जाणून घ्या.

सक्षम बनू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील वाक्ये वाचण्यास सांगावे. गटात चर्चा करून अलंकार हा घटक स्पष्ट करावा.

१) सावळाच रंग तुझा पावसाळी नभापरी.
२) आईचे प्रेम सागरासारखे असते.
३) सानवीचे अक्षर मोत्यासारखे सुंदर आहेत.
४) ज्योतीसम समरात जळाली झाशीची राणी.
५) ये अवखळ पोरीसमान आज सकाळ.

शिक्षकांनी वरील उदाहरणांच्या मदतीने उपमेय,उपमान,साम्यवाचक शब्द व समान गुणधर्म या विषयी चर्चा करून **उपमा** या अलंकाराची ओळख करून द्यावी.

१) चंद्र नभीचा मज भासे तुझा चेहरा .
२) वाटते सानुली मंद झुळूक मी व्हावे .
३) झाडांनी जणू डोक्यावर सोनेरी मुकूट घातले आहे.
४) परिमलाची सुंदर वाचा
मज गमे ती सुंदर फुलांची भाषा .

शिक्षकांनी वरील उदाहरणाच्या मदतीने उपमेय, उपमान, साम्यवाचक शब्द व समान गुणधर्म या विषयी चर्चा करून **उत्प्रेक्षा** अलंकाराची ओळख करून द्यावी.

चला सराव करू या

- **खालील उदाहरणांमधील उपमेय, उपमान व अलंकार ओळखून लिहा.**

१) सुगरणीचे घरटे जणू झोकाच आसमंती .
२) आभाळागत माया तुझी आम्हावरी राहू दे.
३) वीणाचे नाक चाफेकळीप्रमाणे सुंदर आहे.
४) खेड्यातला दिवस हा जणू पायांत आवाजांचे अलंकार घालून जन्माला येत असतो.
५) फुलपाखरांपरी बागडसी तू चंचल बाला.

शिक्षकांनी वरील उदाहरणाच्या मदतीने अलंकार या घटकाविषयी चर्चा करून विविध उदाहरणांद्वारे सराव करून घ्यावा.

दिवस १३

क्षेत्र / कौशल्य – संभाषण, वाचन, लेखन
संकल्पना – वाक्य-प्रकार

क्षमता/कौशल्य : लेखनात वाक्य-प्रकारांचा उपयोग करता येणे.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील वाक्ये वाचण्यास सांगावे. गट तयार करून गटात चर्चा करण्यास सांगावी. शब्द म्हणजे काय? वाक्य म्हणजे काय? यावर गटात चर्चा करण्यास सांगावी. व्याख्या तयार करून घ्यावी. वाक्यातील कर्ता आणि क्रियापद ओळखण्यास सांगणे. शिक्षकांनी वाक्याचे भाग किती व कोणते याबाबत जाणून घेणे.

१) मुलांनो, चांगला अभ्यास करा. २) आईने देवासाठी बागेतून फुले आणली.

३)वा ! छान चित्र काढलेस. ४) तू कोठे गेला होतास ?

शब्द : अर्थपूर्ण अक्षरांचा समूह.

वाक्य : पूर्ण अर्थाचे बोलणे किंवा लिहिणे/ अर्थपूर्ण बोलण्याला किंवा लिहिण्याला **वाक्य** म्हणतात.

वाक्याचे दोन भाग

उद्देश्य	**विधेय**
ज्यांच्याविषयी बोलले जाते (कर्ता)	उद्देश्याविषयी जे बोलले जाते (कर्म + क्रियापद)

शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून खालील वाक्ये वाचून घ्यावीत. त्यातील उद्देश्य व विधेय ओळखायला सांगा.

उदा. -१) शिवाजी महाराज शूर होते. **२)** थोरांचा आदर करावा.

३) आईने स्वयंपाक केला. **४)** तो नेहमी खरे बोलतो.

शिक्षकांनी वरील उदाहरणांद्वारे वाक्यांचे विविध प्रकार कसे पडतात यावर चर्चा करावी.विविध उदाहरणे देऊन **वाक्यांचे प्रकार - विधानार्थी वाक्य, प्रश्नार्थी वाक्य, आज्ञार्थी वाक्य, उद्‌गारार्थी वाक्य** या संकल्पना विद्यार्थ्यांकडून जाणून घ्याव्यात.

सक्षम बनू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील भागाचे अनुवाचन करण्यास सांगावे. वाक्यांचे प्रकार विविध कृतींद्वारे सोदाहरण समजावून सांगावे.

उदा.१) हा वृक्ष खूप उंच आहे. २) माझे घर शाळेजवळ आहे.	१) तू माझ्या गावी केव्हा येणार ? २) तुला कोणता खेळ आवडतो ?

१) विधानार्थी वाक्य :

ज्या वाक्यात केवळ विधान केलेले असते, त्यास विधानार्थी वाक्य म्हणतात.

२) प्रश्नार्थी वाक्य :

ज्या वाक्यात प्रश्न विचारला जातो, त्या वाक्यास प्रश्नार्थी वाक्य म्हणतात.

३) आज्ञार्थी वाक्य :

ज्या वाक्यांतील क्रियापदावरून आज्ञा, प्रार्थना, आशीर्वाद, विनंती, उपदेश या गोष्टींचा आज्ञार्थी वाक्य म्हणतात.

उदा.१) मुलांनो, शिस्त पाळा

२) देवा, मला चांगली बुद्धी दे.

४) उद्‌गारार्थी वाक्य :

ज्या वाक्यात मनातील भावना, तीव्र इच्छा उद्‌गारातून व्यक्त केल्या जातात त्यास उद्‌गारार्थी वाक्य म्हणतात.

उदा.१) बापरे! केवढा मोठा हा अपघात !

२) ठीक!मी येईन तुझ्याकडे .

खालील तक्त्यामध्ये वाक्यांचे प्रकार आणि संबंधित उदाहरण लिहा.

शिक्षकांनी वरील उदाहरणांच्या मदतीने वाक्यांचे प्रकार समजून द्यावेत. विविध उदाहरणे देऊन **वाक्य-प्रकार** ओळखण्यास सांगावे. अधिकाधिक सराव करून घ्यावा.

चला सराव करू या

- **खालील वाक्यांचे प्रकार ओळखा.**

१)आईने बाजारातून भाजी आणली.

२) हे पुस्तक तू वाचलेस का ?

३) अहाहा! किती सुंदर दृश्य आहे हे!

४) मुलांनो, वर्गात शांतता राखा.

५)अरेरे! खूप वाईट वाटले मला!

शिक्षकांनी विविध उदाहरणाद्वारे वाक्यांचे प्रकार ओळखण्यास सांगून वाक्य-प्रकार या घटकाचा अधिकाधिक सराव करून घ्यावा.

दिवस १४

क्षेत्र / कौशल्य – लेखन

संकल्पना – वाक्य-रूपांतर

क्षमता/कौशल्य : वाक्य-रूपांतर करता येणे.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे गट तयार करावेत. गटांमध्ये विविध उदाहरणांद्वारे वाक्यांचे प्रकार याबाबत चर्चा करून पूर्वज्ञान तपासावे. वाक्य प्रकारात होकारार्थी व नकारार्थी वाक्य या प्रकारांचाही समावेश होतो हे सांगणे. खालील तक्ता वाचून घ्यावा.होकारार्थी वाक्याचे नकारार्थी वाक्यात रूपांतर करताना काय केले हे जाणून घ्या.

होकारार्थी वाक्य (करणरूपी वाक्य) - वाक्यात होकार दर्शवलेला असतो.

नकारार्थी वाक्य (अकरणरूपी वाक्य) - वाक्यात नकार दर्शवलेला असतो.

वाक्यरूपांतर - वाक्याचा अर्थ न बदलता एका वाक्य प्रकारातून दुस-या वाक्य प्रकारात बदल करणे, याला **वाक्यरूपांतर** म्हणतात.

उदा. समिधा **धीट** मुलगी **आहे.** (होकारार्थी)

समिधा **भित्री** मुलगी **नाही**. (नकारार्थी)

'धीट' ऐवजी 'भित्रा' हा विरूद्धार्थी शब्द वापरला. 'आहे' या होकारार्थी क्रियापदाऐवजी 'नाही' हे नकारार्थी क्रियापद वापरले.

शिक्षकांनी वरील चर्चेप्रमाणे विविध उदाहरणे देऊन **वाक्यरूपांतर, वाक्यरूपांतराचे नियम** इ. बाबतच्या संकल्पना विद्यार्थ्यांकडून जाणून घ्याव्यात.

सक्षम बनू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील भागाचे अनुवाचन करण्यास सांगावे. गटात चर्चा करून कृती सोडवून घ्यावी. वाक्यांचे प्रकार व वाक्य-रूपांतर अनेक कृतींद्वारे सोदाहरण समजावून सांगावे.

विधानार्थी : हे हस्ताक्षर खूप सुंदर आहे.
प्रश्नार्थी : हे हस्ताक्षर खूप सुंदर आहे, नाही ?
उद्‌गारार्थी : किती सुंदर आहे हे हस्ताक्षर ?
आज्ञार्थी : हस्ताक्षर सुंदर काढा.

होकारार्थी : भारताचा विजय झाला.
नकारार्थी : भारताचा पराजय झाला नाही.
होकारार्थी : मला जवळच जायचे होते.
नकारार्थी : मला लांब जायचे नव्हते.

- **खाली दिलेल्या वाक्याचे दिलेल्या प्रकारात रूपांतर करा.**

वाक्य : सुयश गुणी मुलगा आहे.

१) प्रश्नार्थी वाक्य :.....

२) उद्‌गारार्थी वाक्य : .....

३) आज्ञार्थी वाक्य :.....

४) नकारार्थी वाक्य :.....

शिक्षकांनी वरील उदाहरणाच्या मदतीने वाक्यांचे प्रकार समजून द्यावेत. विविध उदाहरणे देऊन वाक्यप्रकार ओळखण्यास व वाक्यरूपांतर करण्यास सांगावे. अधिकाधिक सराव करून घ्यावा. विविध उदाहरणांद्वारे वाक्यरूपांतर हा घटक समजावून द्यावा.

चला सराव करू या

- **खालील वाक्ये सूचनेप्रमाणे बदल करून लिहा.**

१) आत पाय ठेवायला जागा नाही. (प्रश्नार्थी वाक्य)
२) महात्मा गांधीजींचे कार्य कोण विसरेल? (विधानार्थी वाक्य)
३) हे फूल खूप सुंदर आहे. (उद्‌गारार्थी वाक्य)
४) कुणाचेही वाईट चिंतू नये. (होकारार्थी वाक्य)
५) दररोज व्यायाम करावा. (आज्ञार्थी वाक्य)
६) नेहमी आनंदी राहावे. (नकारार्थी वाक्य

शिक्षकांनी वरील सर्व वाक्ये सूचनेप्रमाणे वाक्यरूपांतर करण्यास सांगून अधिकाधिक उदाहरणांद्वारे वाक्यरूपांतर या घटकाचा सराव करून घ्यावा.

दिवस १५

चाचणी क्रमांक – १

गुण १५

गद्य विभाग **गुण ७**

1) पुढील उतारा लक्षपूर्वक वाचा व त्यावर आधारित कृती सोडवा.

आईला झाडापेडांची खूप हौस होती. तिने परड्यात फुलझाडांबरोबर नाना जातींच्या औषधी वनस्पती लावल्या होत्या . कोष्ट, कोळिंजन, किराईत, आंबा, वावडिंग, कुडा ,अडुळसा, कोरफड यांसारखी झाडे तिच्या हातची .घरात मुलांपैकी कोणी आजारी पडले, की आई परड्यात जाऊन कसलातरी पाला, मुळ्या घेऊन यायची.कफ झाला की कोरफडीचे चाटण असेच. अडुळशाचा गोड काढा प्याल्यावर खोकला पळायचाचं. त्या झाडासारखीच निगराणी आई शेवग्याची करायची. मग आईचा शेवगा तरी मागे कसा राहील ?तोही भराभर वाढत होता. आम्ही त्याची वाढ न्याहाळत होतो. असे दोन तीन वर्ष गेली आणि हिवाळ्यातील एके दिवशी त्याची एक डहाळी -शुभ्र फुलांनी डवरलेली आईने स्वयंपाकघराच्या खिडकीतून पाहिली.

"अगोबाई !शेवगा फुललासा वाटतो !"आई लगबगीने बाहेर गेली. परड्यात जाऊन तिने डोळे भरून ते कौतुक निरखले. तिचा शेवगा खरोखरच खुलला होता !आता त्याला शेंगा येणार होत्या .आईचे माहेरचे जणू जितेजागते होऊन तिच्या सहवासाला आले होते.

कृती

१) उताऱ्यात आलेल्या औषधी वनस्पतींची नावे (२ गुण)

२) याचा काढा प्यायल्यावर खोकला पळायचा- ---------- (१ गुण)

३) कफ घालवण्यासाठी या वनस्पतीचे चाटण करतात- ---------- (१ गुण)

४)**स्वमत** (३ गुण)

- लेखकाने वर्णन केलेले आईचे गुणविशेष तुमच्या भाषेत लिहा.

पद्य विभाग **(गुण ४)**

2) खालील कविता लक्षपूर्वक वाचा व त्याखालील कृती सोडवा

या देशाच्या मातीवरती अमुचा रे अधिकार
नव्या पिढीचे ,नव्या युगाचे स्वप्न करू साकार ॥
फुलामुलांतून हसतो श्रावण
मातीचे हो मंगल तनमन
चैतन्याचे फिरे सुदर्शन
शेतामधुनी पिकवू मोती,
धन हे अपरंपार ॥
या हातांनी यंत्र डोलते

श्रमशक्तीचे मंत्र बोलते
उद्योगाचे चक्र चालते
आभाळा उत्क्रांतीचा घुमवू या ललकार ॥
हजार आम्ही एकी बळकट
सर्वांचे हो एकच मनगट
शक्तीचीही झडते नौबत
घराघरांतून जन्म घेतसे
तेज नवा अवतार ॥
या विश्वाची विभव संपदा
जपू वाढवू आम्ही लाखदा
हस्त शुभंकर हवा एकदा
भविष्य उज्ज्वल या देशाचे करूया जयजयकार ॥

कृती

१) संकल्पना स्पष्ट करा . (२ गुण)

अ)श्रमशक्तीचे मंत्र-

आ)हस्त शुभंकर-

२) कवितेत व्यक्त झालेला एकात्मतेचा विचार स्पष्ट करा. (२ गुण)

भाषाभ्यास विभाग **(४ गुण)**

3) खालील कृती सोडवा.

१) पुढील उदाहरणामधील उपमेय व उपमान सांगून अलंकार ओळखा. २

'आभाळगत माया तुझी आम्हावरी राहू दे.'

२) पुढील वाक्याचा प्रकार ओळखा. १

मुलांनो, वर्गात शांतता राखा.

३) खालील वाक्याचे उद्‌गारार्थी वाक्यात रूपांतर करा. १

फूल खूप सुंदर आहे .

दिवस १६/१७

क्षेत्र / कौशल्य – श्रवण, वाचन, लेखन संकल्पना – विश्वकोश

क्षमता /कौशल्य :१. विश्वकोश संदर्भासाठी पाहता येणे.

२. गीते, समूहगीते, कविता, वक्त्यांची भाषणे व विविध साहित्यप्रकारांच्या ध्वनिफित समजपूर्वक ऐकता येणे.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी खालील प्रश्नांची चर्चा करून साहित्यिकांविषयी माहिती जाणून घ्यावी.

१. एक सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष .....

२. मराठी साहित्य सृष्टीला पहिले ज्ञानपीठ मिळवून देणारे प्रतिभावंत साहित्यिक .....

३. कवी कुसुमाग्रजांचे आडनाव.....

४. समाजसुधारक गोपाळ गणेश.....

५. 'माझी जन्मठेप' हे आत्मचरित्र लिहिणारे..... .

६. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार .....

७. प्रसिद्ध चरित्र - लेखक .....

८. स्त्री साहित्यिका - मालती .....

सक्षम बनू या

विद्यार्थी मित्रांनो, विश्वकोश हा साहित्याचा गाभा आहे. आपल्या मराठी साहित्याला कोश-वाङ्मयाची समृद्ध परंपरा आहे. शब्दकोश, व्युत्पत्ती कोश, विश्वकोश, विश्वचरित्र कोश, संस्कृती कोश, आदी विविध कोशांनी साहित्यभांडार भरलेले आहे. आपण त्याचा वापर करायला शिकू.

पुढील मराठी 'विश्वकोश गौरवगीत' लक्षपूर्वक वाचा. आंतरजालाच्या साहाय्याने त्याची ध्वनिफीत मिळवा व ती ऐका. गीताचा आस्वाद घ्या.

मराठी विश्वकोशाचे अभिमान गीत
अमृताते पैजा जिंके कशी देववाणी
मराठीचे आम्ही सारे सारे अभिमानी
तिच्या सागरमंथनी लाभे अमृत कलश
मराठीच्या वैभवाचा मानकरी विश्वकोश ||
संथ वाहते कृष्णाई, तिच्या काठी गाव वाई
तर्कतीर्थांची भूमी ही, मराठीची हो पुण्याई
यशवंते बांधियेला, मराठीचा ज्ञानसेतू
वर्धिष्णु करू भाषेला, अंतरात शुद्ध हेतू ||

वृक्ष लावियेला द्वारी, अज्ञातास होई ज्ञात
सरस्वतीच्या अंगणी, मराठीचा पारिजात
उपासकांची साधना, करी अज्ञानाचा नाश
मराठीच्या वैभवाचा मानकरी विश्वकोश ||

गीत : डॉ विजया वाड
संगीत : अशोक पत्की
गायक : शंकर महादेवन
संकल्पना व सुलेखन : अच्युत पालव
निर्मिती : महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश मंडळ

चला सराव करू या

पुढील कृती सोडवा :

१.विश्वकोश पाहण्याचे, हाताळण्याचे उपयोग लिहा.

२.मराठी विश्वकोशाचे एकूण वीस खंड प्रकाशित झाले आहेत. ते डिजिटल स्वरूपातही आपणास उपलब्ध आहेत. त्यांचा शोध घ्या. त्या आधारे पुढील दोन शब्दांची माहिती वहीत लिहा.

१] ऑलिंपिक
२] तिफन

दिवस १८

क्षेत्र / कौशल्य - वाचन, लेखन संकल्पना – पद्य

क्षमता /कौशल्य :- विविध काव्यप्रकाराचे अर्थपूर्ण वाचन करून देशभक्तीपर गीताच्या आधारे सैनिकांच्या बलिदानातून स्फूर्ती देणाऱ्या वीररसाची अनुभूती घेता येणे.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी पूर्वज्ञानावर आधारित उदाहरणे देऊन देशभक्तीपर गीते,सैनिकांचे बलिदान, त्याग अशा कवितांना उजाळा देऊन विद्यार्थ्यांशी चर्चा घडवावी.

सदैव सैनिका

सदैव सैनिका पुढेच जायचे
न मागुती तुवा कधी फिरायचे ||धृ.||
सदा तुझ्या पुढे उभी असे निशा
सदैव काजळी दिसायच्या दिशा
मधून मेघ हे नभास ग्रासती
मध्येच या विजा भयाण हासती
दहा दिशातुनी तुफान व्हायचे
सदैव सैनिका पुढेच जायचे ||१||
प्रलोभने तुला न लोभ दाविती
न मोहबंधने पदास बांधती
विरोध क्रोध वा तुला न थांबवी
न मोह भासतो गजान्त वैभवी
न दैन्य हे तुझे कधी सरायचे
सदैव सैनिका पुढेच जायचे ||२||

(वसंत बापट)

शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी वरील कवितेची चर्चा करून खालील कृती सोडवून घ्यावी.

१) सैनिक मनाशी नेहमी कोणते ध्येय बाळगतो ?

२) खालील शब्दांसाठी कवितेमध्ये कोणते पर्यायी शब्द आले आहेत ते लिहा.

१) आकाश २) ढग ३) रात्र

३) ' मी देशसेवक होणार ' यावर आपले विचार व्यक्त करा.

सक्षम बनू या

शिक्षकांनी सैनिकांचा त्याग करणाऱ्या कथा, कविता विद्यार्थ्यांसमोर सांगणे. देशभक्तीपर भावना निर्माण करणे व सैनिकांबद्दलचा अभिमान विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे.

सैनिक हो तुमच्यासाठी

भारतीय नागरिकाचा घास रोज अडतो ओठी
सैनिक हो तुमच्यासाठी, सैनिक हो तुमच्यासाठी
वावरतो फिरतो आम्ही, नित्यकर्म अवघे करतो
राबतो आपुल्या क्षेत्री, चिमण्यांची पोटे भरतो
परि आठव येता तुमचा, आतडे तुटतसे पोटी
सैनिक हो तुमच्यासाठी
आराम विसरलो आम्ही, आळसा मुळी ना थारा
उत्तरेकडुन या इकडे, वार्तांसह येतो वारा
ऐकताच का अश्रूंची, डोळयांत होतसे दाटी
सैनिक हो तुमच्यासाठी

(ग.दि.माडगूळकर)

शिक्षक विद्यार्थ्यांना स्फूर्ती-गीतातून मिळणाऱ्या देशभक्तीची, वीरांच्या बलिदानाची आठवण करून देतात.

अ) १) सैनिकांबद्दल सामान्य जनतेच्या मनातील प्रेम कोणत्या ओळीतून व्यक्त झाले आहे ?
२) भारतीय नागरिकाचा घास कोणासाठी अडकत आहे ?
आ) तुम्हाला माहीत असलेल्या कोणत्याही एका देशभक्ताची माहिती लिहा.

चला सराव करू या

औक्षण

नाही मुठीमध्ये द्रव्य
नाही शिरेमध्ये रक्त,
काय करावें कळेना
नाही कष्टाचे सामर्थ्य;
जीव ओवाळावा तरी
जीव किती हा लहान;
तुझ्या शौर्यगाथेपुढे त्
याची केवढीशी शान;

वर घोंघावे बंबारा,
पुढे कल्लोळ धुराचे,
धडाडत्या तोफांतून
तुझे पाऊल जिद्दीचे ;
तुझी विजयाची दौड
डोळे भरुन पहावी; डोळ्यांतील आसवांची
ज्योत ज्योत पाजळावी
अशा असंख्य ज्योतींची तुझ्यामागून राखण;
दुबळ्यांचे असें
तुला एकच औक्षण.

(इंदिरा संत)

शिक्षकांनी वरील कवितेचा भावार्थ समजावून खालील कृती सोडवून घ्यावी.

कृती- अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) कष्टाचे सामर्थ्य अपुरे केव्हा वाटते ?
२) सैनिकाचे पाऊल जिद्दीचे का वाटते ?
३) डोळे भरुन पहावे असे दृश्य कोणते?

आ) 'सैनिक सीमेवर तैनात असतो ,म्हणून आपण सुरक्षित राहतो', या विधानातील भाव स्पष्ट करा.

दिवस १९

क्षेत्र / कौशल्य – लेखन,वाचन संकल्पना – वचन

क्षमता / कौशल्य : लेखन करताना वचन या घटकाचा वापर करता येणे.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी खालील वाक्ये विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावीत. दोन वाक्यांमधील फरक जाणून घेण्यास सांगावे. विद्यार्थ्यांसोबत चर्चा करून वचन या घटकाबाबत जाणून घेणे.

'अ' गट	'ब' गट
१) झाडावरचे पिकले **पान** गळून पडले.	१) झाडावरची पिकली **पाने** गळून पडली.
२) आजीने **चटई** अंथरली.	२) गावातील गावक-यांनी **चटया** अंथरल्या.
३) वर्षाने बाजारातून नवीन **पुस्तक** आणले.	३) सुट्टीत अर्णवने अनेक **पुस्तके** वाचून काढली.
४) झाडावर मोग-याचे **फूल** उमलले.	४) सईने बागेमध्ये अनेक प्रकारची **फुले** पाहिली.
५) मी रविवारी **शेतात** फिरायला गेलो.	५) पावसाळ्यात **शेते** पिकांनी बहरली.

वरील वाक्ये वाचून खालील कृती सोडवा.

१) वरील वाक्यांमध्ये आलेले एकवचन असणारे शब्द शोधून लिहा.

२) वरील वाक्यांमध्ये आलेले अनेकवचन असणारे शब्द शोधून लिहा.

३) वरील वाक्यांमध्ये आलेले एकवचन व अनेकवचन शब्दांच्या जोड्या लिहा.

शिक्षकांनी वरीलप्रमाणे विविध उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांची **वचन** ही संकल्पना जाणून घ्यावी.

सक्षम बनू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील वाक्यांचे अनुवाचन करण्यास सांगावे. गटात चर्चा करण्यास सांगावे. वचन हा घटक स्पष्ट करावा.

- **खालील वाक्ये वाचा .वाक्यातील एकवचनी व अनेकवचनी शब्द ओळखून लिहा.**

१) समीरचे मन जाणून घेताच, शिक्षकांनी अनेक मुलांची मने जाणून घेतली.
२) सभेमध्ये अनेक खुर्च्या होत्या, त्यातील एक खुर्ची मला मिळाली.
३) कोरोना कालखंडात एका दुकानापाठोपाठ अनेक दुकाने बंद पडली.
४) एक चिमणी येताच झाडावर अनेक चिमण्या जमा झाल्या.
५) कृष्णा नदी वाहत वाहत पुढे अनेक नद्यांना जाऊन मिळते.

- **खालील शब्दांचे वचन ओळखा.**

१) स्वप्न : .....२) काम : .....३) मैत्रिणी : ..... ४) चिंधी : .....

शिक्षकांनी विविध उदाहरणांच्या मदतीने वचन या घटकाविषयी चर्चा करून **एकवचन व अनेकवचन** ही संकल्पना स्पष्ट करून सांगावी.

चला सराव करू या

- **पुढील शब्दांचे वचन बदला. १) आकाश :..... २)वारा : .....३) गावे : ..... ४) इमारती: .....**
- **५) देवालये : ..... ६) महिने : ..... ७) मुली: ..... ८) सण: ..... ९) दिवस: .....**

शिक्षकांनी विविध प्रकारे कृती तयार करून वचन या घटकाचा सराव करून घ्यावा.

दिवस २०/२१ न **क्षेत्र / कौशल्य – लेखन संकल्पना – जाहिरात**

क्षमता /कौशल्य : - १ . दिलेल्या विषयांमध्ये स्वतःच्या विचारांची भर घालून पुनर्लेखन करता येणे.

२ . उपयोजित लेखनातील घटकांवर लेखन करता येणे.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील जाहिरात वाचण्यास सांगून जाहिरात लेखन यावर आधारित कृती सोडवण्यास सांगावी.

१ जाहिरातीचा विषय –

२ जाहिरातीत उल्लेख असलेली वाद्य–

३ वर्गाचे माध्यम –

४ वर्गाचे ठिकाण –

५ वर्गासाठी कालावधी वयोगट

६ शिक्षकांनी गटानुरूप विद्यार्थ्यांना जाहिरातींची कात्रणे गोळा करून त्यावर गटचर्चा घ्यावी अथवा ऑनलाईन वर्गात सादरीकरण करण्यास सांगावे.

७ गटचर्चा/ सादरीकरणातून विद्यार्थ्यांना जाहिरात लेखनाविषयी असलेली जाण लक्षात घ्यावी.



सक्षम बनू या

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील निकषांच्या आधारे एका विषयावर जाहिरात लेखन करण्यास सांगावे.
- विद्यार्थ्यांनी दिलेल्या विषयावर जाहिरात लेखन करून निकषांची पूर्तता होते का? ते अभ्यासावे.
- ❖ आकर्षक मजकूर
- ❖ साधी, सोपी, सरळ पण समर्पक व लक्षवेधी भाषा
- ❖ ग्राहकांच्या मनात विश्वासार्हता निर्माण करणारी असावी
- ❖ जाहिराती मध्ये संपर्क स्थळाचा पत्ता, संपर्क क्रमांक (मोबाईल नंबर, ईमेल आयडी) यांचा स्पष्ट उल्लेख असावा.
- ❖ जाहिरात पेनने करावी.

चला सराव करू या

✓ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील कृती पूर्ण करण्यास सांगावे.

१ . ऑनलाईन चित्रकला स्पर्धेची आकर्षक जाहिरात तयार करा.

२ .खालील शब्दांवरून जाहिरात लेखन करा.

आयुर्वेद, प्रतिकार शक्ती, अधिक परिणामकारक, सवलत, योग्य दर

✓ विद्यार्थ्यांनी जाहिरात पत्रकं तसेच वर्तमानपत्रात येणाऱ्या जाहिरातींचे समजपूर्वक वाचन करावे सृजनशील वैविध्यपूर्ण कृतींचा शोध घ्यावा व अभ्यास करावा.

दिवस २२

क्षेत्र / कौशल्य – लेखन संकल्पना – वाक्प्रचार

क्षमता/कौशल्य : १) मराठी भाषेतील म्हणी, वाक्प्रचार यांची यादी करता येणे.

२) योग्य म्हणी, वाक्प्रचार, शब्दसमूह यांचा उपयोग करून परिच्छेद लिहिता येणे.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून वाक्ये वाचून घ्यावीत. त्यांचे गट पाडून गटात वाक्यात आलेले वाक्प्रचार व त्यांचे अर्थ यावर चर्चा करावी. वाक्प्रचार या घटकाबाबत पूर्वज्ञान जाणून घ्यावे.

१) अरुणिमाने एव्हरेस्ट शिखर सर करून आपल्या अपंगत्वावर मात केली.

२) नोकरी मिळवण्यासाठी अभिषेकने खूप खटाटोप केला.

३) बाबा रागावताच देविकाने तोंडाला कुलूप लावले.

४) शिक्षकांनी मयंकच्या सुंदर.वळणदार हस्ताक्षराची प्रशंसा केली ,

५) कोरोनामुळे आईचे निधन होताच आनंदी पोरकी झाली.

- **वरील वाक्यात आलेले वाक्प्रचार चार शोधून लिहा.**

१. जोड्या जुळवा.

'अ' गट : वाक्प्रचार	**'ब' गट : अर्थ**
१)जीवाचे कान करून ऐकणे	अ) दु:ख होणे
२)चेहरा उतरणे	ब) खूप लक्षपूर्वक ऐकणे
३)डोळ्यांत पाणी येणे	क) खूप घाबरणे
४)डोळे पांढरे होणे	ड) नाराज होणे

शिक्षकांनी विविध उदाहरणांच्या माध्यमांतून शब्दशः होणारा अर्थ लक्षात न घेता विशिष्ट अर्थाने आलेला शब्दासमूह हा फरक जाणून घ्यावा. **वाक्प्रचार** या संकल्पनेबाबत जाणून घ्यावे.

सक्षम बनू या


शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील उता-याचे अनुवाचन करण्यास सांगावे. गटात चर्चा करून उता-यातील वाक्प्रचार शोधण्यास सांगून त्याचे अर्थ व वाक्यात उपयोग करण्यास सांगावे. वाक्प्रचार हा घटक सोदाहरण स्पष्ट करावा.

- **खालील परिच्छेद वाचा त्यातील वाक्प्रचार शोधून खालील तक्त्यामध्ये वर्गीकरण करा.**

स्टेशनवर बैलगाडी घेऊन मामा आला होता. आम्ही बैलगाडीत बसलो आणि घराच्या रस्त्याला लागलो. मन आनंदाने थुईथुई नाचत होते. घरी येताच तोंडभर हसून मामीने आमचे स्वागत केले. मामाची मुले आमची वाट पाहत होती . आम्ही एकमेकांना कडकडून भेटलो. एवढ्यात आजी आमच्या जवळ आली. आम्ही आजीला बिलगलो. तिने आमच्या तोंडावरून हात फिरवला. आम्हाला खूप गहिवरून आले.

वाक्प्रचार	अर्थ	वाक्यात उपयोग

- **शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील आकृतीचे निरीक्षण करण्यास सांगावे. गटात चर्चा करून 'भीती वाटणे' हा विविध वाक्प्रचारांचा अर्थ आहे हे सोदाहरण समजून द्यावे.**



शिक्षकांनी विविध उदाहरणांद्वारे **वाक्प्रचार** हा घटक स्पष्ट करावा.वाक्यप्रचारांचे दैनंदिन वापरातले महत्त्व, लेखनातील महत्व विद्यार्थ्यांना समजावून द्यावे.

चला सराव करूया

- **खालील वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

१) बेत करणे.
२) तिळपापड होणे .
३) आनंद गगनात मावेनासा होणे.
४) नवल वाटणे .
५) दिसेनासे होणे.
६) हिरमुसले होणे.
७) रवाना होणे .

शिक्षकांनी विविध उदाहरणांद्वारे वाक्प्रचार, अर्थ, वाक्यात उपयोग या घटकांचा सराव करून घ्यावा.

दिवस २३

क्षेत्र / कौशल्य – लेखन

संकल्पना – शब्दसमूहाबद्दल एक शब्द

क्षमता/कौशल्य : लेखन करताना शब्दसमूहाबद्दल एक शब्द या घटकाचा वापर करता येणे.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी खालील वाक्ये विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावे. दोन वाक्यांमधील फरक जाणून घेऊन विद्यार्थ्यांना गटात चर्चा करण्यास आणि कृती सोडवण्यास सांगावी.

१) मूर्ती करणा-याने मूर्ती तयार केली.	१) मूर्तीकाराने मूर्ती तयार केली.
२) दररोज प्रसिद्ध होणारे सकाळ वृत्तपत्र आजोबांनी वाचून काढले.	२) दैनिक सकाळमध्ये आज शाळेची बातमी आली होती.
३) शेती करणारा शेतात जाऊन अहोरात्र कष्ट करतो.	३) शेतक-याने शेताचे नंदनवन केले.
४) आईबाबा नामकरणविधी समारंभासाठी गावी गेले.	४) घरी शेजा-यांकडून बारशाचे निमंत्रण आले.
५) गाण्याच्या मैफिलीसाठी सर्व वाद्य वाजवणारे एकत्र जमले.	५) वादकांनी वाद्ये वाजवून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

१)वरील वाक्यांमध्ये आलेले शब्दांचे समूह शोधा. .....

२)वरील वाक्यांमध्ये आलेल्या शब्दसमूहांसाठी एक शब्द शोधा.

१) ..... २) .....३) ..... ४) .....५) .....

३)वरील वाक्यांत आलेले शब्दसमूह आणि शब्दसमूहांसाठी एक शब्द यांच्या जोड्या लिहा.

शिक्षकांनी वरीलप्रमाणे विविध उदाहरणांद्वारे **शब्दसमूहांबाबत एक शब्द** हा घटक समजावून द्यावा.

सक्षम बनू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना 'अ' व ' ब' गटातील शब्द व शब्दसमूह वाचण्यास सांगून गटात चर्चा करावी. खालील शब्दसमूहासांठी एक शब्द जोड्या जुळवण्यास सांगून शब्दसमूहाबबद्दल एक शब्द या घटकाची ओळख करून द्यावी.

'अ' गट (शब्दसमूह)	'ब' गट (शब्द)
१) केलेले उपकार जाणणारा.	अ) मासिक
२) ईश्वराचे अस्तित्व मानणारा.	ब) कवयित्री
३) महिन्यातून एकदा प्रसिद्ध होणारे.	क) आस्तिक
४) कविता करणारी.	ड) कृतज्ञ


- **खालील एक शब्दासाठी शब्दसमूह लिहा.**

१) क्षितिज **: .....४)** अनवाणी**: .....**

२) लेखक **: .....५)** गायक**: .....**

३) साक्षर**: .....६)** साप्ताहिक**: .....**

शिक्षकांनी वरीलप्रमाणे विविध उदाहरणांच्या मदतीने शब्दसमूहांबद्दल एक शब्द ही संकल्पना स्पष्ट करून सांगावी.



- **खालील शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा.**

१) ग्रामपंचायतीचे प्रमुख :

२) दगडातून सुंदर पुतळे घडवणारा :

३) जाणून घेण्याची इच्छा :

४) विद्यार्जन करणारा :

५) ईश्वराचे अस्तित्व न मानणारा :

शिक्षकांनी विविध उदाहरणांद्वारे शब्दासमूहाबद्दल एक शब्द घटकाचा सराव करून घ्यावा.

दिवस २४/२५

क्षेत्र / कौशल्य – लेखन व वाचन संकल्पना – बातमी लेखन

क्षमता /कौशल्य : –१. घटना, प्रसंग यावर आधारित सुसंगत विचार करून त्याबाबत लेखन करता येणे.

२. घडलेले प्रसंग, कार्यक्रम, घटना यांचे वृत्तांतलेखन करता येणे.

जाणून घेऊ या



भीमाशंकरमधील शेकरूंच्या संख्येत वाढ

पुणे : भीमाशंकर अभयारण्यात नुकत्याच झालेल्या प्राणिगणनेत दोन हजार ७२३ शेकरूंची नोंद झाली आहे. जीपीएस यंत्रणेद्वारे १६ हजार ३४३ शेकरूंची घरटी नोंदविण्यात आली आहेत, तर ४८२ शेकरू प्रत्यक्ष दिसले आहेत.

शेकरू हा महाराष्ट्राचा राज्यप्राणी आहे. भीमाशंकर 'शेकरूंचे अभयारण्य' म्हणून ओळखले जाते. भीमाशंकर अभयारण्यात शेकरूंचे प्रमाण सर्वाधिक आहे. शेकरू हा समृद्ध अभयारण्याचे प्रतीक असून, संपूर्ण पश्चिम घाटात त्याचा वावर आहे. मात्र, प्रत्येक राज्यात त्याच्या रंगात फरक दिसतो. या खारीची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी वन विभागातर्फे दर वर्षी गणना केली जाते.

शेकरू साधारणतः पावसाळ्यापूर्वी काही दिवस आधी नवीन घरटे तयार करतात. याची नोंद घेऊनच मे महिन्याच्या अखेरीस शेकरूंची गणना केली जाते. शेकरूंच्या गणनेसाठी प्रत्येक वन कर्मचाऱ्याला भीमाशंकरचे विविध भाग वाटून दिले होते. वन कर्मचाऱ्यांनी झाडाखाली उभे राहून त्याची 'जीपीएस'मध्ये नोंद केली. यात जुने, नवीन, पिल्लू असलेल्या घरट्यांची माहिती लिहिण्यात आली. यासाठी अभयारण्य १२ भागांत विभागण्यात आले होते. आहुपे, पिंपरगणे भट्टी, साकरमाचीवाडी, साकेरी, पाटण, कोंढवळ, निगडाळे, भोरगिरी या क्षेत्रांत प्रत्यक्ष मोजणी करण्यात आली.

शेकरू गणनेत वनसंरक्षक (वन्यजीव) विभाग एस. रमेशकुमार, सहायक वनसंरक्षक दिलीप भुर्के यांच्या मार्गदर्शनाखाली वन परिक्षेत्र अधिकारी वसंत चव्हाण यांच्या वन कर्मचाऱ्यांच्या तुकडीने ही गणना केली.

भीमाशंकर अभयारण्यातील शेकरू.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील बातमी वाचण्यात सांगून बातमी लेखनाविषयी पुढील गोष्टींवर चर्चा करावी.

१. बातमीचे शीर्षक कोणते आहे?
२. बातमीमध्ये दिनांक, स्थळ, कालावधी इत्यादीचा उल्लेख आहे का?
३. बातमीदाराने आपले मत बातमीमध्ये मांडले आहे का?
४. प्रत्यक्ष घडलेल्या अनुभवलेल्या घटनेचे लेखन केले आहे का?

शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे गट करून वर्तमानपत्रातील बातमीचे कात्रण काढून त्यावर बातमीचा मथळा, दिनांक, स्थळ, बातमीतील तपशील याविषयी चर्चा करण्यास सांगावे. गटचर्चेतून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना बातमी लेखनाविषयी असलेली जाण लक्षात घ्यावी.

सक्षम बनू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना चालू घडामोडीतील कोणत्याही एका विषयावर खालील निकषांच्या आधारे बातमी लेखन करण्यास सांगावे.

विद्यार्थ्यांनी त्यांनी केलेल्या बातमी लेखनात खालील निकषांची पूर्तता होते का? ते अभ्यासावे. बातमी लेखनात निकषांची पूर्तता होत नसल्यास बातमीचे पुनर्लेखन करावे.

१. बातमीला योग्य शीर्षक द्यावे.
२. दिनांक, स्थळ, कालावधी, संबंधित व्यक्ती यांचा अचूक उल्लेख असावा.
३. घटना घडून गेल्यानंतर बातमी लेखन केल्यामुळे बातमी भूतकाळात लिहावी.
४. बातमी लिहिताना प्रथम महत्त्वाचा मुद्दा लिहून त्यानंतर त्याचा तपशील द्यावा.

चला सराव करू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील विषयावर बातमी लेखन करण्यास सांगावे.

तुमच्या गावातील कोविड योद्ध्यांच्या सत्कार समारंभाची बातमी तयार करा.

विद्यार्थ्यांनी दररोज वर्तमान पत्र वाचावे. त्यातील विविध विषयांवर येणाऱ्या बातम्यांचे समजपूर्वक वाचन करावे. बातमी लेखनाचा सराव करावा.

दिवस २६/२७

क्षेत्र / कौशल्य – लेखन व वाचन संकल्पना – पद्य

क्षमता /कौशल्य :- विविध साहित्याचे समजपूर्वक वाचन करून त्याचा आस्वाद घेता येणे.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी पूर्वज्ञानावर आधारित उदाहरणे देऊन मागील इयत्तेतील अभंग, संतांचा उपदेश, कार्य यांवर विद्यार्थ्यांची चर्चा घडवावी.

उदाहरण१ . भेटीलागीं जीवा लागलीसे आस ।पाहे रात्रंदिवस वाट तुझी ॥१॥
पूर्णिमेचा चंद्रमा चकोरा जीवन । तैसें माझें मन वाट पाहे ॥२॥

शिक्षकांनी अभंगाची चर्चा करून अभंगातील भावार्थ समजावून द्यावा.
प्रश्न- अ-१) 'आस लागणे' म्हणजे काय?
२) संत तुकाराम विठ्ठलाला कोणती विनंती करीत आहेत?
आ-१) 'भेटी लागी जीवा लागलीसे आस । पाहे रात्रंदिवस वाट तुझी ॥'या ओळींचा अर्थ स्पष्ट करा.

सक्षम बनू या

शिक्षकांनी वरीलप्रमाणे विविध इयत्तांमधील संतवाणीतील अभंग रचना विद्यार्थ्यांकडून म्हणून घ्याव्यात. त्याचा आशय, भक्तिभाव विद्यार्थ्यांना समजावून सांगून भक्ती-रसाचा अनुभव द्यावा. तसेच अपरिचित शब्दांकडे, दृष्टांताकडे लक्ष देण्यास सांगावे.

आजि सोनियाचा दिवस । दृष्टी देखिले संतांस ॥ १॥
जीवा सुख झालें ।माझें माहेर भेटलें ॥२॥
(संत सेना महाराज)

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना संतवाणीतून, संतांच्या सान्निध्यातून मिळणाऱ्या आनंदाची अनुभूतीचे दाखले द्यावेत.

प्रश्न-
१) संत सेना महाराजांचा शीण कशामुळे गेला?
२) चौकट पूर्ण करा.
१ . असा दिवस- ( )
२ . दृष्टीस दिसले- ( )
३ . सुख झाले - ( )
३) संतांचे कार्य तुमच्या शब्दांत व्यक्त करा.

संतवाणी

(अ) अंकिला मी दास तुझा- संत नामदेव
(आ) योगी सर्वकाळ सुखदाता- संत एकनाथ

शिक्षकांनी वरील दोन संतवाणीच्या रचना व भावार्थ इ. ची माहिती द्यावी.

चला सराव करू या

संत एकनाथ व संत नामदेव यांचे अभंग गोळा करून त्यातील अपरिचित शब्दांची यादी करावी.
शब्दकोशातून अथवा वडीलधाऱ्यांकडून अर्थ समजावून घ्यावेत.

खालील कृती सोडवून घ्यावी.

कृती.
खालील काव्यपंक्तीचा अर्थ स्पष्ट करा.

१) सवेंची झेंपावे पक्षिणी । पिलीं पडतांचि धरणीं ॥ भुकेले वत्सरावें ।
धेनु हुंबरत धावें ॥

२) 'योगी पुरुष पाण्यापेक्षा श्रेष्ठ आहे 'हे तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

दिवस २८/२९

क्षेत्र / कौशल्य – लेखन व वाचन संकल्पना – स्थूल वाचन

क्षमता /कौशल्य : १. दिलेल्या उताऱ्याच्या आशयाची मध्यवर्ती कल्पना, सारांश, विचार समजून घेऊन लेखन करता येणे.

२ . विविध साहित्यप्रकारांचे समजपूर्वक वाचन करणे, चिकित्सक विचार करून स्वतंत्र व प्रभावी लेखन करता येणे.

जाणून घेऊ या

विद्यार्थ्यांनी पुढील उताऱ्याचे गटात प्रकटवाचन करावे. आशय समजून घेऊन त्या खालील कृती सोडवाव्यात.

काझिरंगाची सफर

काझीरंगा नाव कसं रंगीबेरंगी वाटतं, नाही का ? पण हे नाव आहे एका दाट जंगलाचं, आसममधील मिकीर डोंगर आणि ब्रम्हपुत्रा नदीच्या मध्ये ४३० चौरस किलोमीटरच्या क्षेत्रफळात पसरलेल्या दाट जंगलाचं. आता हे जंगल अभयारण्य म्हणून घोषित करण्यात आले आहे. या दाट जंगलात एक फेरफटका मारल्यास अनेक तऱ्हेचे वन्य पशू फिरताना आणि अनेक प्रकारांचे, आणिक आकारांचे आणि अनेक रंगाचे पक्षी या झाडावरून त्या झाडावर उडताना दिसतात.मन कसं प्रसन्न होतं, पण हे काहीकाझीरंगाचं मुख्य आकर्षक नाही. इथलं मुख्य आकर्षक आहे गेंडा. नाकाच्या टोकावर शिगं असलेला या अजस्र प्राण्याला पाहण्यासाठीच हजारो लोक या दाट जंगलाला, काझीरंगाला भेट देतात. इथं या गेंडयाचंच साम्राज्य आहे म्हणा ना !

कोणे एके काळी या जंगलात एका वन्य टोळीचं अस्तित्व होतं. या टोळीच्या राजपुत्राच नाव होत काझिर. त्याच्या अंगावर नेहमी लाल रंगाचेच कपडे असत म्हणे ! आणि त्या लाल रंगामुळे या जंगलातील पशुपक्षी आकर्षिले गेले आणि त्याचे मित्रा झाले. या काझिरमुळे आणि त्याच्या अंगावरील रंगीत पोषाखामुळे या जंगलाच नाव झालं "काझी-रंगा" म्हणजेच काझीरंगा ! अर्थात ही एक दंतकथा आहे. खरंखोट त्या जंगलालाच ठावूक.

लेखक : श्रीपाद डोंगरे

कृती :

१. जंगल सफरीत मन प्रसन्न करण्याऱ्या गोष्टी लिहा .
२. काझिरंगाचे मुख्य आकर्षण लिहा.
३. एखाद्या ठिकाणच्या नावामागील दंतकथा शोधा व ती थोडक्यात लिहा.
४. तुम्ही पाहिलेल्या एखाद्या निसर्ग-दृश्याचे वर्णन पाच ते सहा ओळींत लिहा.
५. 'द जंगलबुक' हा चित्रपट पाहा व त्याचा आस्वाद घ्या.

सक्षम बनू या

विद्यार्थी मित्रांनो, प्रवासवर्णन, अनुभव कथन या संकल्पना दृढ होण्यासाठी, त्याचे तुम्हांस उत्तम आकलन होण्यासाठी तुम्ही अशा उताऱ्यांचा शोध घ्या. ते वाचा व त्यावर चर्चा करा.

जंगलात फिरण्यासाठी मला एक हत्तीण मिळाली होती. तिचे नाव वैजयंती असे होते. मोठी देखणी, इंद्राच्या ऐरावताची मुलगी शोभेल अशी होती ती आणि चालत पण होती ऐटीत, की गवतातून चालताना जणू रेशमी साडी सळसळते आहे असे वाटावे. निघाल्यापासून थोड्याच वेळात ती एका जराशा उघड्या ठिकाणी आली आणि माहुताने खूण केल्याबरोबर उभी राहिली. समोरच आमच्याजवळ एक गेंडा अगदी निश्चल उभा होता. चिलखत घालून पहाऱ्यावर उभ्या असलेल्या एखाद्या विशालकाय योध्या- सारखा. जराशी मान हालवून त्याने आमच्याकडे पाहिले व मनात नक्की केले, की आपली जागा सोडून पुढे-मागे होण्याची जरुरी नाही. त्याचा फोटो घेण्याची माझी मनीषा जाणून माहुताने हत्तीणीला चुचकारत चुचकारत उभी केली. मी गेंड्याचे मनसोक्त फोटो घेतले. त्या माहुताकडून दोन गोष्टींची माहिती मिळाली. बाजारात गेंड्याच्या नाकावरील शिंगाची किंमत जवळजवळ दोन हजार रुपये इतकी असते ही एक व दुसरी अशी, की शरीर थंड राखण्यासाठी चिखलाने अंग माखुन घेणारा गेंडा हा सामाजिक आरोग्याचा भोक्ता असतो. संबंध मोठ्या जंगलात फक्त एकाच ठिकाणी जाऊन तो आपली विष्ठा टाकतो. कित्येक मैल दूर असला तरी त्याच एका जागेवर तो नेहमी परतून येतो. घाण वाटेल तेथे टाकू नये, शेजाऱ्या-पाजाऱ्यांना त्रास होईल असे वागू नये हे समजणारा गेंडा निसंशय शहाणाच म्हटला पाहिजे.

कृती १. वैजयंती हत्तीणीचे लेखकाने टिपलेले विशेष लिहा.

२. उताऱ्यात नोंदविलेल्या गेंड्याच्या सवयी लिहा.

३. वन्यप्राण्यांकडून आपण शिकवण घ्यावी या संदर्भात उताऱ्यात आलेली वाक्ये शोधून लिहा.

चला सराव करूया

विद्यार्थी - मित्रांनो, जंगलातील, रानावनातील वन्यजीवन म्हणजे एक अदभुत जग आहे ते अनुभवणं, जाणून घेणं आणि अनीवार ओढीनं, कुतूहलानं आस्वादणं हे आपलं आयुष्य समृद्ध करणारं आहे. तुम्हीही असा एखादा प्रत्यक्ष अनुभव घेतला असेल. पुस्तकातून वाचला असेल. दूरदर्शनवर (टीव्ही) पाहिला असेल. तर अशा अनुभवाच्याआधारे प्रवासवर्णनपर किमान एक परिच्छेद लिहा.

टीप : व्यंकटेश माडगूळकरांची 'जंगलातील दिवस', 'नागझिरा ' आदी पुस्तके अथवा इतर प्रवासवर्णनपर पुस्तके मिळवून वाचा.

दिवस ३०


चाचणी क्रमांक – २

गुण १५

पद्य विभाग

कृती १ : - कवितेच्या आधारे सूचनांनुसार कृती करा : **[६ गुण]**

(१) आकृती पूर्ण करा : **२ गुण**



(२) पुढील गोष्टींचे कारण लिहा : **२ गुण**

१. चकोर पक्षी पौर्णिमेच्या चंद्राची वाट पाहतो. - .....

२. भुकेलेले बाळ आईची वाट पाहते. - .....

भेटीलागीं जीवा लागलीसे आस |
पाहे रात्रंदिवस वाट तुझी || १ ||
पूर्णिमेचा चंद्रमा चकोराजीवन |
तैसें माझें मन वाट पाहे || २ ||
दिवाळीच्या मुळा लेंकीं आसावली |
पाहातसे वाटुली पंढरीची || ३ ||
भुकेलिवा बाळ अति शोक करी |
वाट पाहे उरि माउलीची || ४ ||
तुका म्हणे मज लागलीसे भूक |
धांवूनि श्रीमुख दांवी देवा || ५ ||

(३) खालील ओळींचा सरळ अर्थ लिहा : **२ गुण**

भेटीलागीं जीवा लागलीसे आस |
पाहे रात्रंदिवस वाट तुझी ||

भाषाभ्यास विभाग

कृती २ : - व्याकरण घटकांवर आधारित कृती : **[४ गुण]**

(१) वचन : **१ गुण**

- **वचन बदला :**

१. पाऊल - **.....** **२.** नद्या - **.....**

(२) शब्दसमूहांबद्दल एक शब्द : **१ गुण**

- **खालील शब्दसमूहांबद्दल एक शब्द लिहा.**

१. केलेले उपकार न जाणणारा -

२. आंब्यांच्या झाडांची बाग -

(३) वाक्यप्रचार : **२ गुण**

- **खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

१. आनंद गगनात मावेनासा होणे.

२. पोटात गोळा येणे.

उपयोजित लेखन विभाग

कृती ३ : - खालीलपैकी कोणतीही एक कृती सोडवा : **[५ गुण]**

(१) खालील विषयावर आकर्षक जाहिरात तयार करा : (शब्दमर्यादा - ६० ते ९० शब्द)

- **खालील शब्दांवरून जाहिरात तयार करा :**

बेकारी, केक, बिस्किटे, ताजे पदार्थ, ग्राहक समाधान .

(२) खालील विषयावर बातमी तयार करा : (शब्दमर्यादा - ६० ते ९० शब्द)

' स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात संपन्न ' या शीर्षकावरून बातमी लेखन करा.

*****

दिवस ३१/३२

क्षेत्र / कौशल्य – लेखन व वाचन

संकल्पना – निसर्ग कविता

क्षमता /कौशल्य :- विविध निसर्ग कवितांचे समजपूर्वक वाचन करून त्याचा आस्वाद घेता येणे.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी पूर्वज्ञानावर आधारित उदाहरणे देऊन मागील इयत्तेतील निसर्ग कविता, निसर्गाच्या बहरामुळे प्राप्त झालेले सृष्टी-सौंदर्य, संगणकीय युगातही मातीशी असणारा जिव्हाळा निर्माण करणे.

उदाहरण -

उजाड उघडे माळरानही

स्वागत करण्या वसंत ऋतूचे रंग उधळले दिशा- दिशांना, बेरड कोरड इथली सृष्टी घेऊन आली ती नजराणा ॥
गर्द पोपटी लेऊन वसने मुरडत आली लिंबोणी,
जर्द तांबडी कर्णफुलेही घालून सजली नागफणी ॥
आंब्याच्या मोहरातून आली
कोकिळेची सुरेल तान, उजाड उघडे माळरानही गाऊ लागले वसंतगान ॥

(ललिता गादगे)

शिक्षकांनी निसर्ग कवितेची ओळख करून देऊन कवितेतील सौंदर्य स्थळांचा आनंद विद्यार्थ्यांना द्यावा .

अ-१) कवितेत आलेले यमक साधणारे शब्द निवडून लिहा.

२) वसंत ऋतूचे स्वागत कसे केले आहे ?

3) वसंतगान कोण गाऊ लागले ?

सक्षम बनू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मनात उद्या आनंदाने जगण्यासाठी आता निसर्ग-संवर्धन व पर्यावरणाची काळजी घेतली पाहिजे तसेच परिसराला हिरवंगार करण्याची जबाबदारी सर्वस्वी आपली आहे ही भावना रुजवणे.

नाच रे मोरा

नाच रे मोरा आंब्याच्या बनात
नाच रे मोरा नाच ॥धृ॥
ढगांशी वारा झुंजला रे
काळा काळा कापूस पिंजला रे
आता तुझी पाळी वीज देते टाळी
फुलव पिसारा नाच
नाच रे मोरा आंब्याच्या बनात
नाच रे मोरा नाच
झरझर धार झरली रे
झाडांची भिजली इरली रे

पावसात न्हाऊ काहीतरी गाऊ
करुन पुकारा नाच
नाच रे मोरा आंब्याच्या बनात
(ग.दि.माडगूळकर)

शिक्षक विद्यार्थ्यांना बालगीताच्या माध्यमातून निसर्गातील बदलाच्या आनंदाची अनुभूती देतात.

कृती

१) खालील शब्दांचे अर्थ सांगा.

इरली-

पिंजणे-

पुकारा-

२)'झरझर' या शब्दासारखे अजून चार शब्द शोधून काढा.

(आ) पाऊस सुरू झाल्यानंतर निसर्गात होणारे बदल तुमच्या शब्दांत लिहा.

चला सराव करू या

(अ) रंग मजेचे रंग उद्याचे- अंजली कुलकर्णी

(आ) हिरवंगार झाडासारखं- जॉर्ज लोपीस

शिक्षकांनी वरील दोन निसर्ग कवितांची विद्यार्थ्यांना ओळख करून द्यावी व खालील कृती सोडवून घ्यावी.

कृती.

१) पूर्ण करा.

अ)जेथे वृष्टी पाऊस ते असे ठिकाण ➞

आ)कवयित्रीच्या मते जपायची गोष्ट➞

२)आकृती पूर्ण करा.

झाडाकडे टक लावून पाहिल्यानंतर घडणाऱ्या गोष्टी

⬇ ⬇ ⬇

----- -------- -------

३) झाडाचे मानवी जीवनातील स्थान याविषयी तुमचे विचार लिहा.

दिवस ३३

क्षेत्र / कौशल्य – लेखन

संकल्पना – समानार्थी शब्द व विरुद्धार्थी शब्द

क्षमता / कौशल्य : लेखन करताना समानार्थी शब्द व विरुद्धार्थी शब्दांचा वापर करता येणे.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील उतारा लक्षपूर्वक वाचण्यास सांगून गटात चर्चा करण्यास सांगावी. उता-यातील समानार्थी व विरुद्धार्थी शब्दांचा शोध घेण्यास सांगावे.

उतारा

काल सकाळी सहाच्या सुमारास मी बाबांबरोबर फिरायला गेलो. पूर्वेकडून सूर्य वर येत होता. सूर्याची ती लालसर पिवळी किरणे किती वेगळी व छान दिसत होती ! त्यांच्याकडे मी वारंवार पाहत होतो. सकाळचा तो गारवा किती छान वाटत होता. रस्त्यातल्या झाडांवर वेगवेगळे पक्षी बसलेले होते. त्यांचे वेगवेगळेआवाज कानावर पडत होते.बाबा खूपच भरभर चालत होते. चालता चालता मी मात्र दमलो होतो. बाबांना मी थांबायला सांगितले. आम्ही एके ठिकाणी बसलो. बाबा मला सकाळच्या मोकळ्या व शुद्ध हवेविषयी माहिती सांगत होते. खरंच त्या मोकळ्या व शुद्ध हवेचा अनुभव मला येत होता. मला प्रसन्न व ताजेतवाने झाल्यासारखे वाटत होते. रोज सकाळी लवकर उठण्याचा आणि फिरायला जाण्याचा अनुभव तुम्ही पण घ्या. तुम्हालाही छान वाटेल.

वरील उतारा वाचून कृती सोडवा.

१) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.

१) सूर्य .....२) सकाळ.....३) झाड .....४) पक्षी .....

२) खालील शब्दांच्या समान अर्थाचे शब्द उता-यातून शोधून लिहा.

१) कर्ण .....२) मार्ग.....

३) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.

१) काल ×.....२) भरभर × .....३) वर × .....४) ताजे × .....

४) खालील शब्दांच्या विरुद्ध अर्थाचे शब्द उता-यातून शोधून लिहा.

१) अशुद्ध × .....२) पश्चिम × .....

५) खालील शब्दांच्या जोड्या जुळवा.

समानार्थी शब्द

'अ' गट	**'ब' गट**
१) थट्टा	अ) माता
२) आई	ब) कष्ट
३) श्रम	क) मस्करी

विरुद्धार्थी शब्द

'अ' गट	**'ब' गट**
१) मित्र	अ) परावलंबन
२) स्वावलंबन	ब) शत्रू
३) सज्जन	क) दुर्जन

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरीलप्रमाणे विविध उदाहरणे देऊन **समानार्थी शब्द व विरुद्धार्थी शब्द** ही संकल्पना जाणून घ्यावी

सक्षम बनू या

- **शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील वाक्ये वाचण्यास सांगावे .गटात चर्चा करण्यास सांगून खालील वाक्यांत आलेले समानार्थी शब्द व विरुद्धार्थी शब्द शोधण्यास सांगावे.**


विरुद्धार्थी शब्द :

१) प्रगती हे जीवनाचे ध्येय असावे.
२) नेहमी सत्य बोलावे.
३) मिळवलेले यश टिकावे.
४) कविता हुशार मुलगी आहे.
५) ताईने मला नवा सदरा दिला.


समानार्थी शब्द :

१) ग्रंथ हे खरे पथदर्शक.
२) पारिजातकाचा सुगंध आसमंतात दरवळतो.
३) तुझे मुख कमळासारखे सुंदर आहे.
४) नियमित व्यायाम करावा.
५) पावसाळी ढग आभाळात भरून आले.

खालील शब्दांत लपलेल्या समानार्थी शब्दांच्या जोड्या शोधून लिहा.



- **खालील शब्दांत लपलेल्या विरुद्धार्थी शब्दांच्या जोड्या शोधून लिहा.**



शिक्षकांनी वरीलप्रमाणे उदाहरणांच्या मदतीने **समानार्थी व विरुद्धार्थी शब्दांचा** वापर योग्य ठिकाणी कसा करावा हे समजून द्यावे . अधिक सरावासाठी अशा प्रकारच्या विविध कृती सोडवून घ्याव्यात.

चला सराव करू या

- **खालील शब्दांचे समानार्थी शब्द व विरुद्धार्थी शब्द लिहा.**

समानार्थी शब्द	**विरुद्धार्थी शब्द**
१) धीर =.....	**१) मृत× .....**
२) इनाम=.....	**२) हजर × .....**
३) काया=.....	**३) गुण × .....**
४) देव=.....	**४) कृपा × .....**
५) अग्नी=.....	**५) महागडा × .....**
६) धवल =.....	**६) उष्ण × .....**
७) देश =.....	**७) अल्पकाळ× .....**

शिक्षकांनी विविध उदाहरणांद्वारे समानार्थी व विरूद्धार्थी शब्दांचा सराव करून घ्यावा.

दिवस ३४

क्षेत्र / कौशल्य – लेखन व वाचन संकल्पना – विरामचिन्हे

क्षमता/कौशल्य : १) विरामचिन्हे विचारात घेऊन अर्थपूर्ण प्रकटवाचन करता येणे.

२) लेखनात विरामचिन्हांचा वापर करता येणे.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील वाक्ये वाचण्यास सांगावी. गटात चर्चा करण्यास सांगावी. विरामचिन्हे या घटकाबाबत जाणून घ्यावे.

१)जाई जुई मोगरा गुलाब ही फुलांची नावे आहेत
२) तुझे आवडते पुस्तक कोणते

वरील वाक्ये वाचताना नेमके कोठे थांबावे हे समजणार नाही, कारण या वाक्यात विरामचिन्हे नाहीत. हे बोलताना आपण योग्य त्या ठिकाणी कमी-अधिक वेळ थांबतो. तोच आशय लिहिताना कळावा यासाठीच लेखनात विरामचिन्हांचा वापर केला जातो, हे विद्यार्थ्यांना लक्षात आणून द्यावे.

- **खालील विरामचिन्हे ओळखून चिन्हाचे नाव लिहा.**

१) !		५) -	
२) ‘ ’		६) ?	
३) :		७) ;	
४) ,		८) _	

- **खालील वाक्यातील चुकीची विरामचिन्हे काढून त्या जागी योग्य विरामचिन्हे घाला.**

१) सर म्हणाले. आपण सर्वजण सहलीला जाऊ?
२) ओहो, किती सुंदर दृश्य आहे ते ?
३) तुम्हांला मी उत्तप्पा बनवू का.

शिक्षकांनी वरीलप्रमाणे विविध उदाहरणे देऊन **विरामचिन्हे** हा घटक जाणून घ्यावा.

सक्षम बनू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील उता-याचे वाचन करून विरामचिन्हांचा योग्य वापर करून उतारा पुन्हा लिहिण्यास सांगावे. लेखनातील विरामचिन्हांचे महत्त्व समजावून द्यावे .

मुलांनो शाळेत तुम्हाला अनेक मित्र असतात तुमची काळजी घेणारे तुमचे आरोग्य जपणारे असे अनेक मित्र तुमच्या सभोवती आहेत कोण बरे आहेत हे मित्र असा प्रश्न तुम्हाला निश्चित पडेल आपल्याला फळे फुले सावली देणरे वृक्ष आपल्याला पिण्यासाठी पाणी देणा-या नद्या श्वसनासाठी ऑक्सिजन देणारी हवा आपण ज्यावर निवांतपणे राहतो अशी जमीन अर्थातच आपल्या सभोवतालचा निसर्ग हाच आपला खरा मित्र आहे.

खालील विरामचिन्हांची नावे वाचा. त्यापुढील चौकटीत विरामचिन्हे लिहा. विरामचिन्हे वापरून प्रत्येकी एक वाक्य तयार करा.

अ.क्र.	विरामचिन्हांची नावे	विरामचिन्हे	वाक्य
१)	प्रश्नचिन्ह		
२)	अपूर्ण विराम		
३)	उद्गारचिन्ह		
४)	अर्धविराम		
५)	दुहेरी अवतरणचिन्ह		

शिक्षकांनी वरीलप्रमाणे उदाहरणांच्या मदतीने विद्यार्थ्यांना **विरामचिन्हे** हा घटक समजावून द्यावा. लेखनातील विरामचिन्हांचे महत्त्व समजावून द्यावे.अधिक सरावासाठी अशा प्रकारच्या विविध कृती सोडवून घ्याव्यात.

चला सराव करूया

- **पुढील वाक्ये वाचा व तक्ता पूर्ण करा.**

१) तुला खेळायला आवडते का ?
२) संत ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ लिहिला.
३) इंडोनेशियावर डचांनी राज्य केले; पण बालीला कोणी बदलू शकला नाही.

अ.क्र.	विरामचिन्हे	विरामचिन्हांची नावे

शिक्षकांनी विविध उदाहरणाद्वारे विरामचिन्हे या घटकाचा अधिक सराव करून घ्यावा.

दिवस ३५

क्षेत्र / कौशल्य – लेखन व वाचन संकल्पना – पद्य

क्षमता /कौशल्य :- विविध साहित्यप्रकाराचे समजपूर्वक वाचन करता येणे व त्याचा आस्वाद घेता येणे.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी खालील कविता विद्यार्थ्यांना वाचावयास सांगून कवीच्या दृष्टिकोनाविषयी विद्यार्थ्यांशी चर्चा करावी.

जीवन गाणे

या सृष्टीचे मंजुळ गाणे
जगणे मजला शिकवून गेले,
झिलमिलणारे चंद्र ,चांदणे
जगणे मजला शिकवून गेले.
बुलंद तरीही असे हौसले पिल्लासाठी किती सोसले,
चिवचिवणाऱ्या चोचीमधले
दाणे मजला शिकवून गेले.
सागराची अथांगता अन
ही वृक्षाची स्थितप्रज्ञता,
दुसऱ्यासाठी घाव सोसणे
जगणे मजला शिकवून गेले.

(नितीन देशमुख)

१) आकृती पूर्ण करा.

कवीच्या अनुभवातील जग

--- ---

२) कवीला जगणे शिकवणारे कवितेतील घटक-

आ) 'दुसऱ्यासाठी घाव सोसणे 'या ओळीतील तुम्हाला कळलेला अर्थ स्पष्ट करा.

सक्षम बनू या

शिक्षकांनी वरीलप्रमाणे सामाजिक कवितांमधून जीवनाकडे पाहण्याचा आशावादी दृष्टिकोन, निकोप, आदर्श समाज निर्माण करण्याची ताकद नवीन पिढीकडे आहे याची जाणीव उदाहरणाच्या साहाय्याने स्पष्ट करावी.

पुन्हा एकदा

पुन्हा एकदा चमकावी वीज उतरावी खाली भिनावी रक्तात
पेटावे स्नायू करीत पुकार पुन्हा एकवार
पुन्हा एकदा घालीत पिंगा पावसाच्या सरी व्हाव्यात बेभान
कोसळाव्या खाली मातीत माती
व्हावी एक....
पुसून टाकीत भेदाभेद ....
पुन्हा एक वेळ ....

पुन्हा एकदा घुमावा वारा युवक इथला भारला जावा भुलावी तहान नवनिर्माणाची लागावी चाहूल
उजळावी भूमी ...
दिगंतात...
पुन्हा एकदा....

(प्रतिमा इंगोले)

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना कवितेतून मिळणाऱ्या आनंदाचा अनुभव घेण्यासाठी प्रेरित करावे.

कृती :

एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) कवयित्रीच्या मते नवनिर्माणाची चाहूल कोणाला लागावी ?

२) कवयित्री कोणाला तहान ,भूक विसरायला सांगते ?

(आ) नवनिर्मितीचा ध्यास घेतलेले लोक सर्वसामान्यांपेक्षा वेगळे असतात, यावर तुमचे विचार सोदाहरण स्पष्ट करा.

चला सराव करू या

' दोन दिवस'

(नारायण सुर्वे)

शिक्षकांनी वरील कवितेचा भावार्थ समजावून खालील कृती सोडवून घ्यावी.

कृती.

१) पद्यांशात आलेले ऋतूचे नाव-(---------)

२)' रोजीरोटी' या शब्दासाठी पद्यांशात आलेला शब्द-(----------)

(आ)'शेकडो वेळा चंद्र आला; तारे फुलले ,रात्र धुंद झाली; 'यातील कल्पना स्पष्ट करा.

दिवस ३६

क्षेत्र/कौशल्य–लेखन व वाचन

संकल्पना – लेखन- नियमांनुसार लेखन

क्षमता/कौशल्य : लेखन करताना शुद्धलेखनाच्या नियमांचे पालन करणे.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील वाक्ये वाचण्यास सांगावे. विद्यार्थ्यांचे गट तयार करून गटात चर्चा करण्यास सांगावे. शुद्धलेखन जाणून घ्यावे.

१) मला वीश्वास आहे. खूप खूप शूभेच्छा !

२) गुलाबाचे फुल खूप सूंदर आहे.

३)येक रेल्वे धडधडत निघुन गेली.

४) दुरवर जंगलातून येणारा लाकुडतोड्या दिसला.

५) पाऊसात मुले भीजली.

१) वरील उदाहरणांमध्ये आलेले शुद्ध शब्द ओळखून लिहा .

.....

२) वरील उदाहरणांमध्ये आलेले अशुद्ध शब्द ओळखून लिहा .

.....

- **खालील अशुद्ध शब्द शुद्ध करून लिहा.**

चूक	परीक्षा	शीक्षिका.....	तु.....
बहिण	दिपावली	आशिर्वाद	कवि .....
वदंन	मराठि.....	प्राथर्ना.....	

शिक्षकांनी अशाप्रकारे विविध उदाहरणांद्वारे गटात चर्चा करावी. विद्यार्थ्यांची **शुद्धलेखनाची** जाण लक्षात घ्यावी.

सक्षम बनू या

शिक्षकांच्या मदतीने खालील उतारा वाचा.गटात चर्चा करून उता-यातील अशुद्ध शब्दांची यादी तयार करा.

आसामचे वैशिष्ट्य दाखवणारा दूसरा प्राणी म्हणजे एकशिंगी गेंडा. राज्य सरकारचे प्रतीक म्हणुन आसामात ठीकठीकाणी त्याचे पुतळे उभारलेले आढळतात| कुणी म्हणेल हा अगदी निर्बुद्ध प्राणि एखाद्या राज्याचे प्रतीक म्हणून का पंसंत केला जावा? पण प्रथमदर्शी वाटतो. तितका हा प्राणी टाकावू नाही. कोणातरी इंग्रजी कवीने गेंड्यावर एक लहाणशी कवीता करून तो मानसापेक्षा कसा श्रेष्ट आहे ते दाखवले आहे.

- **अशुद्ध शब्दांची यादी.**

--- --- --- --- ---

--- --- --- --- ---

- **खालील शब्द अशुद्ध की शुद्ध ते लिहा.**

१) मित्र -
२) चावडि-
३) कणर्फुले-
४)दुरंगी -
५) माहिति-
६)कूटुंब-
७)दृष्टीकोन-
८)ओजस्वी -
९)आम्बा-

शिक्षकांनी वरील विविध उदाहरणांच्या मदतीने अनुस्वार, -हस्व, दीर्घ या विषयी चर्चा करून शुद्धलेखनाचे नियम, लेखनातील शुद्धलेखनाचे महत्त्व याबाबत माहिती देऊन **लेखन नियमांनुसार लेखन** हा घटक समजावून द्यावा.

चला सराव करू या

- **खालील उदाहरणांमधील लेखन नियमांनुसार शुद्ध शब्द ओळखा.**

१) ऊज्ज्वल/उज्ज्वल /उज्वल/ऊज्वल .....

२) क्रिडांगण/क्रीडांगण/क्रिंडागण/क्रिडांगन .....

३) शिरीष /शिरिष/शिरीश/शीरीष .....

४) मैत्रिण /मेत्रिण/मेत्रीण/मैत्रीन .....

५) सामूहिक /समूहिक/सामुहिक/सामूहीक .....

शिक्षकांनी विविध उदाहरणांद्वारे शुद्ध लेखनाचा सराव करून घ्यावा.

दिवस ३७/३८

क्षेत्र / कौशल्य – लेखन व वाचन

संकल्पना – आत्मकथन लेखन

क्षमता /कौशल्य : – १ .कल्पनांचा विस्तार करता येणे.

२ .घटना, प्रसंग, स्वानुभव यांचे लेखन करता येणे.

जाणून घेऊ या

विद्यार्थी मित्रांनो, ऑनलाईन शाळेमुळे तुम्हाला शाळेतील गमती-जमती अनुभवता येत नाहीत. मित्र- मैत्रिणींबरोबरच्या गप्पा, मधली सुट्टी, एकमेकांचे डबे, या सगळ्यांची तुम्हाला आठवण येत असेल. चला तर मग आज आपण एक खेळ खेळूया... तुमच्याप्रमाणेच तुमच्या शाळेला सुद्धा तुमची खूप आठवण येत आहे असे समजून 'लॉकडाऊन मधील शाळेच्या' मनोगताविषयी एकमेकांमध्ये चर्चा करूया.



टप्पे –

- ❖ प्रस्तुत विषयाच्या संदर्भात प्रत्येक विद्यार्थ्याला आपले मुद्दे मांडण्यास सांगावे.
- ❖ एकमेकांचे मुद्दे ऐकून घेतल्यावर वहीत १२ ते १५ ओळीत ते लिहिण्यास सांगावे.
- ❖ प्रातिनिधीक स्वरूपात मुद्यांचे वाचन करून घ्यावे.
- ❖ त्रुटी, उणिवा जाणवल्यास मार्गदर्शन करावे.

सक्षम बनू या

- ✓ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना **'मी संगणक बोलतोय...'** या विषयावर पंधरा ते वीस ओळीत पुढील निकषांच्या आधारे लेखन करावयास सांगावे.
  - ➢ मनोगत, आत्मकथन लिहिताना प्रथमपुरुषी एकवचनी लेखन असावे.
  - ➢ भावस्पर्शी असावे.
  - ➢ आपण स्वतः ती वस्तू आहोत अशी कल्पना करावी.

✓ विद्यार्थ्यांनी वरील निकषांच्या आधारे दिलेल्या विषयावर आत्मकथन लिहावे.

माझी जन्मकहाणी
तुमच्या शिक्षणातील उपयोग



वेगाने झालेला प्रसार
सर्व क्षेत्रातील संचार

चला सराव करूया

- …..(स्रोत पाठ क्र.१४ – ते जीवनदायी झाड)

निर्मिती



सजीवांसाठी जीवनदायी

शास्त्रीय उपयोग

जल चक्रातील मुख्य घटक

दिवस ३९/४०/४१

क्षेत्र / कौशल्य – लेखन व वाचन

संकल्पना - प्रसंग लेखन

क्षमता /कौशल्य :– १ .घटना, प्रसंग यांवर आधारित सुसंगत विचार करून त्याबाबत लेखन करता येणे.

२ .उपयोजित लेखन घटकांवर लेखन करता येणे.

जाणून घेऊ या

विद्यार्थी मित्रांनो, खालील चित्र बारकाईने पहा आणि त्या विषयी तुमच्या मनात येणारे विचार सांगा.

मुलांनो , पाहिलेला प्रसंग, कार्यक्रम, स्वतः अनुभवलेली एखादी घटना आपण दुसऱ्याला सांगतो. त्याचं वर्णन करतो. हे सांगणे अथवा वर्णन करणे जेव्हा आपण लेखनातून शब्दबद्ध करतो; तेव्हा त्याला आपण 'प्रसंगलेखन' असे म्हणतो.

चला तर मग.. वरील चित्रातील प्रसंगाचे आपण वर्णन करूयात व नंतर ते लिहू या.



शिक्षकांनी पुढील क्रमाने विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान तपासावे.

- विद्यार्थ्यांचे निरीक्षण
- विद्यार्थी करीत असलेले चिंतन
- मनातील विचार, भावनांची सुसंगत मांडणी
- चित्रवर्णनाकडून प्रसंग लेखनापर्यंतचा प्रवास.
    - ❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे गट करून प्रत्येक गटात स्वतंत्र चित्र देऊन परस्परात चित्रांविषयी चर्चा करण्यास सांगावे. चित्राच्या अनुषंगाने नवनवीन उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांच्या विचारांना चालना द्यावी. केलेल्या निरीक्षणाचे सोप्या भाषेत लिखाण करण्यास प्रेरित करावे.

सक्षम बनू या

आजोबांचा एकसष्टी सोहळा – दिनांक: १ जानेवारी - घरातील व्यक्तींची मनोगते – आजोबांच्या मित्रांची मनोगते - पूर्वीच्या आठवणींना उजाळा - आजोबांची तुला.

- ✓ विद्यार्थी मित्रांनो, वरील प्रसंगी तुम्ही उपस्थित होता अशी कल्पना करून त्या प्रसंगाचे लेखन करा. लेखन करताना खालील निकषांचा आधार घ्यावा.
- ✓ शिक्षकांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या वरील प्रसंगाचे वर्णन खालील निकषांच्या आधारे तपासावे.
- ➢ घटनांचा तार्किक विचार करावा.
- ➢ भाषा सोपी असावी. खूप आलंकारिक नसावी.
- ➢ चित्रदर्शी (हुबेहूब) वर्णन करावे.
- ➢ लेखन प्रसंगानुरूप संवेदनशील असावे.

चला सराव करू या

सिटी हायस्कूल

सिडको नाशिक आयोजित

मराठी दिनानिमित्त आयोजित विविध स्पर्धांचा ऑनलाईन पारितोषिक वितरण सोहळा

मराठमोळ्या संस्कृतीचे दर्शन घडवणारा सोहळा

- **कवितावाचन**
- **वक्तृत्व स्पर्धा**
- **अभिवाचन**

प्रमुख अतिथी - राजीव तांबे (प्रसिद्ध बाल साहित्यिक)

कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी –

Zoom id - **********

Facebook live - ********

वरील ऑनलाईन कार्यक्रमाला आभासी माध्यमातून तुम्ही उपस्थित होता अशी कल्पना करून प्रसंगाचे वर्णन करा

- **अभयारण्यातील फेरफटका** – (स्रोत – काझीरंगा – स्थूलवाचन)

  अभयारण्य कोणते ? त्याचे भौगोलिक स्थान, वैशिष्ट्ये - अभयारण्य निवडी मागचे कारण, तिथे कसे गेलात – तेथील कार्यक्रमाच्या दिनक्रमाचे स्वरूप - तेथील निसर्ग वातावरण याचे वर्णन - तेथील पशुपक्षी इत्यादीचे वर्णन-पर्यावरणाबद्दल निरीक्षण, पर्यावरणाचे जतन/ हानी - तुमच्या मनातील भावना.

दिवस ४२/४३


क्षेत्र / कौशल्य – लेखन संकल्पना – पत्र लेखन

क्षमता /कौशल्य : –१ . दिलेल्या विषयावर स्वतंत्र लेखन करता येणे

२ . पत्रलेखन या उपयोजित लेखन आतील घटकांवर लेखन करता येणे.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील कृती काळजीपूर्वक वाचण्यास सांगावी व गटात चर्चा करण्यासाठी प्रवृत्त करावे.



१ . विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने वृक्षारोपणासाठी रोपांची मागणी करणारे पत्र लिहा. किंवा

२ . वृक्षारोपणाच्या कार्यक्रमात सहभाग घेतल्याबद्दल तुमच्या मित्र /मैत्रिणीचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील कृती वाचण्यास सांगून पत्रलेखनासाठी आवश्यक असणाऱ्या घटकांवर सविस्तर चर्चा करून विद्यार्थ्यांना असलेली माहिती जाणून घ्यावी.

उदाहरणार्थ-

१. पत्रलेखनाचा विषय कोणता आहे?

२. वरील कृतीनुसार पत्रलेखनाचे प्रकार सांगा?

३. मागणी पत्र कोणाला लिहिणार आहात?

४ . पत्र ई –मेल स्वरूपात लिहीत असताना कशा पद्धतीने लिहावे.

सक्षम बनू या

औपचारिकपत्र	अनौपचारिकपत्र
दिनांक--------	दिनांक-----
प्रति,	प्रिय/ति./ति.सौ.(नात्याप्रमाणे उल्लेख)
माननीय-------	
विषय -	विषय लिहू नये.
महोदय,	महोदय न लिहिता नात्याप्रमाणे उल्लेख
मुख्य मजकूर	मुख्य मजकूर
आपला/आपली	आपला/आपली/तुझा/तुझी
पत्ता -	पत्ता –
ई-मेलआयडी-	ई-मेल आयडी –

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील पत्रांच्या प्रारुप नमुन्यांचे निरीक्षण करायला सांगून सर्व घटकांची माहिती करून द्यावी. पत्रलेखनाचा प्रकारानुसार लेखनातील फरकांवर चर्चा करावी.

उदाहरणार्थ –

१. पत्रलेखन प्रकारानुसार सुरुवात (मायन्यातील बदल)
२. पत्राचा विषय
३. पत्राचा मुख्य मजकूर
४. पत्राचा समारोप

ई-मेल स्वरूपात पत्र लिहीत असताना लक्षात ठेवायच्या गोष्टींवर सविस्तर चर्चा करावी.

चला सराव करू या

शिक्षकांनी खालील प्रमाणे उदाहरणे देऊन पत्रलेखनाचा सराव करावा.

आशिया खेळ भंडार

माफक दर घरपोच सेवा उपलब्ध

सर्व खेळांचे साहित्य एकाच छताखाली उपलब्ध

पत्ता - 2 मेन रोड, मरीन लाइन्स, मुंबई -400020 भ्रमणध्वनी- ********** ई-मेल आयडी- ashiyabhandar@*********

विद्यार्थीप्रतिनिधी या नात्याने क्रीडा स्पर्धेसाठी मैदान उपलब्ध करून देण्याबाबत व्यवस्थापकांना विनंती पत्र लिहा.

किंवा

विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने आपल्या शाळेतील राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक विजेत्या मित्र/मैत्रिणीचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.शिक्षकांनी अशा प्रकारची उदाहरणे देऊन पत्रलेखनाचा सराव करून घ्यावा .

विद्यार्थ्यांनी आप्तेष्टांना प्रत्यक्ष ई-मेल ने पत्र पाठवून पत्रलेखनाचा सराव करावा.

दिवस ४४

क्षेत्र / कौशल्य – लेखन संकल्पना – समास

क्षमता/कौशल्य : समासाचा लेखनात उपयोग करता येणे.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील उदाहरणांचे गटात प्रकटवाचन करण्यास सांगावे. खाली दिलेल्या प्रश्नांप्रमाणे विविध प्रश्न विचारून समास हा घटक समजून घेण्यास मदत करावी.

'अ' गट	'ब' गट
१) आदित्य शक्तीप्रमाणे गरजूंना मदत करतो.	अ) आदित्य यथाशक्ती गरजूंना मदत करतो.
२) प्रत्येक आई आणि वडील मुलांची काळजी घेतात.	ब) प्रत्येक आई-वडील मुलांची काळजी घेतात.
३) आजीने बाजारातून भाजी, पाला वगैरे आणला.	क) आजीने बाजारातून भाजीपाला आणला.
४) नम्रता प्रत्येक दिवशी अभ्यास करते.	ड) नम्रता दररोज अभ्यास करते.

खालील कृती सोडवा.

१)वरील 'अ' व 'ब' गटातील वाक्यांचा अर्थ कसा आहे ते सांगा. अ) सारखा ब) भिन्न

२) 'ब' गटातील प्रत्येक वाक्यात दोन शब्द एकत्र येऊन तयार झालेले जोडशब्द ओळखून लिहा.

.....

३)दोन शब्द एकत्र येऊन जोडशब्द तयार होतात त्यांना काय म्हणतात? .....

४) सामासिक शब्दामध्ये एकूण किती शब्द असतात? त्यांना काय म्हणतात ?

१)..... २).....

शिक्षकांनी वरील उदाहरणांद्वारे **सामासिक शब्द, समासाचा विग्रह, समासाचे प्रकार इ. संकल्पना** समजावून द्याव्यात.

सक्षम बनू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील उता-याचे अनुवाचन करण्यास सांगावे. समास या घटकाच्या आधारे अशा प्रकारचे नमुना उतारे तयार करावेत आणि त्यावरील कृतींचा सराव घ्यावा.

सुट्टीचे दिवस सुरू होते. सुट्टीमध्ये रात्रंदिवस सहलीला नेमके कोठे जावे? याबाबत चार-पाच मित्रांमध्ये चर्चा सुरू होती. या चर्चेमध्ये मुले-मुली सहभागी होते. चर्चेनंतर बागेमध्ये भटकंती करण्याचे ठरले. ठरल्या दिवशी मुले आपल्या आई-बाबांसोबत फिरायला गेले. तिथे गेल्यानंतर मुलामुलींनी रंगोबेरंगी पाने फुले पाहिली, तिथला निसर्ग पाहिला. मुलामुलींचे कोणताही भेदाभेद न करता एकत्र खेळणे सुरू झाले. खेळ झाल्यानंतर सर्वजण आपल्या मित्रमैत्रिणींसोबत गप्पागोष्टी करीत आनंदाने मीठभाकर खाऊ लागले. एकमेकांचे सुखदु:ख सांगू लागले.त्यानंतर यथावकाश सर्व मंडळी घरी सुखरूप पोहोचली.

- **वरील उता-यातील सामासिक शब्द शोधून त्यांचे खालील तक्त्यात वर्गीकरण करा.**

सामासिक शब्द	विग्रह	समासाचे प्रकार

शिक्षकांनी विविध उदाहरणांच्या मदतीने अव्ययीभाव समास, द्वंद्व समास, इतरेतर द्वंद्व समास, वैकल्पिक द्वंद्व समास व समाहार द्वंद्व समास याविषयी चर्चा करून **समास** हा घटक समजून द्यावा.

चला सराव करू या

- **खालील शब्द समूहापासून सामासिक शब्द तयार करा व समासाचा प्रकार लिहा.**

शब्द समूह	सामासिक शब्द	समासाचा प्रकार
१)बरे किंवा वाईट	.....	.....
२)जन्मापासून	.....	.....
३)स्त्री आणि पुरुष	.....	.....
४)केरकचरा वगैरे	.....	.....
५)प्रत्येक गावी	.....	.....

शिक्षकांनी विविध उदाहरणांद्वारे समास या घटकाचा अधिक सराव करून घ्यावा.

दिवस ४५

चाचणी क्रमांक – ३

गुण ३०

विभाग 1 - गद्य

(गुण 7)

1. पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.

2. कोण ते लिहा. 2

i) कमानदार दिवा तयार करणारे –

ii) कृत्रिमरित्या प्रकाश निर्माण करण्याचे आव्हान स्वीकारणारे –

एडिसनने आव्हान स्वीकारले खरे; पण हे काम वाटते तितके सोपे नव्हते. कृत्रिमरित्या प्रकाश निर्माण करण्याचे व रात्रीचे दिवसात रूपांतर करण्याचे यापूर्वीही काही प्रयत्न झाले. सर हंफ्रे डेव्ही याने खाणीमध्ये वापरण्यासाठी एक कमानदार दिवा तयार केला होता. त्यात वीज वाहून नेणाऱ्या तारांच्या टोकांना कार्बनचे म्हणजे कोळशाच्या पदार्थाचे तुकडे जोडलेले होते. तारांची कार्बन जोडलेली टोके जवळ आणली, की त्यातून झगझगीत प्रकाश निर्माण व्हायचा; पण या प्रकाशाच्या उपयोगाला फार मर्यादा होत्या. दर वेळी कार्बनचे तुकडे जाळून प्रकाश निर्माण करणे हे काम खर्चिक होते. त्यातून निर्माण होणारा विषारी वायू हाही धोकादायक होता. प्रकाश तर जास्त वेळ टिकणारा हवा. तो कमी खर्चात निर्माण करता यायला हवा. तो फार प्रखरही नको. त्यातून विषारी वायूचा धोकाही नको. हे सारे कसे जमायचे? एडिसनचे विचारचक्र सुरू झाले.

3. एका वाक्यात उत्तर लिहा. 2

i) कोणत्या प्रकाशाच्या उपयोगाला मर्यादा होत्या?

ii) कृत्रिम प्रकाशासाठी कोणत्या अटी होत्या ?

4. **स्वमत** – वीज बचतीचे महत्त्व तुमच्या शब्दांत थोडक्यात स्पष्ट करा . 3

विभाग 2 - पद्य

(गुण 8)

2. कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.

1. चौकट पूर्ण करा. 2

i) पिंगा घालीत येणाऱ्या –

ii)दिगंतात उजळणारी –

पुन्हा एकदा चमकावी वीज उतरावी खाली भिनावी रक्तात
पेटावे स्नायू करीत पुकार पुन्हा एकवार

पुन्हा एकदा घालीत पिंगा पावसाच्या सरी व्हाव्यात बेभान
कोसळाव्या खाली मातीत माती
व्हावी एक....
पुसून टाकीत भेदाभेद ....
पुन्हा एक वेळ ....

पुन्हा एकदा घुमावा वारा युवक इथला भारला जावा भुलावी तहान नवनिर्माणाची लागावी चाहूल
उजळावी भूमी ...
दिगंतात...
पुन्हा एकदा....

2. कृती पूर्ण करा.

i)प्रस्तुत कवितेचे कवी / कवयित्री – 1

ii)प्रस्तुत कवितेतील खालील शब्दांचा अर्थ लिहा. 2

1 . वीज - 2 .रक्त- 3.युवक - 4 .भूमी –

iii) प्रस्तुत कवितेचा विषय - 1

3. ‘ मातीत माती व्हावी एक, पुसून टाकीत भेदाभेद’ या ओळीचा तुम्हाला समजलेला अर्थ स्पष्ट करा. 2

विभाग 3 स्थूलवाचन (गुण 3)

1.काझिरंगाचे मुख्य आकर्षण लिहा. 3

विभाग 4 – भाषाभ्यास (गुण 2)

1. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा. 1

i) कर्ण - ii) मार्ग –

2. खालील विरामचिन्हे ओळखून चिन्हाचे नाव लिहा. 1

i) ‘ ------’ -

ii) ! -

विभाग 5 - उपयोजित लेखन (गुण 10)

1. बातमी लेखन – 5

तुमच्या शाळेत ऑनलाईन साजरा झालेल्या स्वातंत्र्य दिनाची बातमी तयार करून लिहा.

2. लेखन कौशल्य- 5

खालील कृती सोडवा.

लॉकडाऊनमधील विद्यार्थ्यांचे मनोगत –

शालेय जीवन - शाळेतील गंमती जमती – ऑनलाईन शाळेचे अनुभव - शाळेची आठवण - तुमचे मत.